POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१५८ ● मुंबई, शुक्रवार, ०९ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## १५ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी जाहीर
## महाराष्ट्र सरकारचा निर्णय, कोणाकोणाला लागू?

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

महाराष्ट्र सरकारने बीएमसी निवडणूक आणि इतर २९ महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुढील गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.

ही सुट्टी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांसह २९ महानगरपालिका क्षेत्रांना लागू असेल. मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी ही सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. राज्य सरकारने यापूर्वी जाहीर केलेल्या ही सुट्टी २०२६ च्या २४ सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये समाविष्ट नव्हती. "ही सार्वजनिक सुट्टी केवळ संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कार्यक्षेत्रासाठी लागू असेल" असे एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

**मतदानाची वेळ-वार काय?**

या सुट्टीमुळे मुंबईतील शेअर बाजार बंद राहण्याची शक्यता आहे. मात्र रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. तसेच मुंबईसाठीच्या आरबीआयच्या सुट्ट्यांच्या यादीत १५ जानेवारीचा समावेश नाही. पुढील गुरुवार १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. सर्व मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे.

**खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांबाबत काय निर्णय?**

खाजगी क्षेत्रातील नोकरदारांच्या सुट्टीबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. संबंधित संस्थांना आपल्या कर्मचाऱ्यांना सुट्टी द्यायची की नाही, हे घेण्याचा अधिकार आहे. काही संस्था आपल्या कर्मचाऱ्यांना मतदानासाठी सकाळी किंवा संध्याकाळी दोन तास सूट देण्याचा निर्णय घेऊ शकतात.

**१६ जानेवारी रोजी निकाल**

राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील २९ महापालिकांच्या निवडणुका १५ जानेवारी रोजी एकाच टप्प्यात घेण्याची घोषणा केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर केला जाईल. आशियातील सर्वात मोठी नागरी संस्था असलेल्या बीएमसीसाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक ७४,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

**मुंबई महापालिकेत किती मतदार?**

बीएमसी निवडणुकीत एकूण १,०३,४४,३१५ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. यामध्ये ५५,१६,७०७ पुरुष मतदार, ४८,२६,५०९ महिला मतदार आणि १,०९९ इतर मतदारांचा समावेश आहे. २०१७ च्या निवडणुकीत अखंड शिवसेनेने ८४ जागा जिंकल्या होत्या.




**गैरहजर राहिल्यास कारवाई...**

**निवडणूक आयोगाचा प्रशिक्षणाबाबत कर्मचाऱ्यांना इशारा**

महापालिका निवडणुकांसाठीचे मतदान आणि मतमोजणीकरिता पुरेशा प्रमाणात अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. या सर्वांचे वेळेत प्रशिक्षणही पूर्ण झाले पाहिजे; तसेच प्रशिक्षणास गैरहजर राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत. महापालिका निवडणुकांसाठी मतदान व मतमोजणीची तयारी आणि कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात सर्व २९ महानगरपालिका आयुक्त, संबंधित पोलीस आयुक्त व जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची गेले दोन दिवस दूरचित्र संवादाच्या माध्यमातून (व्हीसी) बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलीस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा यांच्यासह आयोगातील विविध अधिकारी उपस्थित होते. मतदान आणि मतमोजणीची प्रक्रिया सुरळितपणे पार पाडण्यासाठी सर्वांचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. मतदान केंद्रांवर विविध व्यवस्था करण्याबाबतही सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांना अवगत करावे. मतदानासाठी येणाऱ्या मतदारांची गैरसोय होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घ्यावी. मतदान केंद्रावर विजेच्या उपलब्धतेबरोबरच पिण्याचे पाणी, सावली, शौचालयाची इत्यादींची व्यवस्था असणे आवश्यक आहे. शक्य असेल तिथे आदर्श मतदान केंद्रे उभारण्यात यावीत. मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तान्ह्याबाळासह असणाऱ्या स्त्रिया, गरोदर स्त्रिया आदींना मतदानासाठी प्राधान्य द्यावे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्प आणि व्हिलचेअरसारख्या व्यवस्थाही असाव्यात, असे वाघमारे यांनी सांगितले.

## भावपूर्ण श्रद्धांजली

मृत्यू
मंगळवार दिनांक
३०/१२/२०२५
रोजी



**दशक्रिया विधी**

दिनांक ०८/०१/२०२६, गुरुवार, सकाळी ०७.३० वाजता जेसेल पार्क चौपाटी, भाईंदर भाईंदर मीरारोड

**तेरावे (श्राद्ध) विधी**

दिनांक ११/०१/२०२६, रविवार राहत्या घरी करण्यात येईल. पत्ताः गुरुप्रसाद बंगला, जुना गोल्डन नेस्ट, फेज ३, कवीन मेरी शाळेजवळ, वेदकेअर हॉस्पिटलच्या बाजूला, भाईंदर (पूर्व) ४०१ १०७

**संपर्क :**

गुरुप्रसाद नाईक ९५९४४१८१८१, ८६९२०३३३३०

(येतांना कोणीही दुखवटा सोबत आणू नये.)

अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले, तरी त्यांच्या आत्म्यास चिरःशांती लाभों हिच ईश्वरचरणी प्रार्थना!!!

**कै. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक**

शोकाकुल : समस्त नाईक परिवार

## ईव्हीएम सुसज्ज करण्याच्या कामाची राज्य निवडणूक आयुक्तांकडून पाहणी




**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज विल्सन महाविद्यालयास भेट देऊन बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या मतदानासाठी सुरू असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) सुसज्ज करण्याच्या कामाची पाहणी केली आणि उपस्थिती अधिकारी- कर्मचारी व उमेदवारांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली.

बृहन्मंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी एकूण २३ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे नियुक्ती करण्यात आली आहे. त्यापैकी प्रभाग क्र. २०१४ ते २२२ चे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब वाघचौरे असून त्यांचे कार्यालय विल्सन महाविद्यालयात आहे. श्रीमती शीतल देसाई, श्रीमती यू. टी. मुल्ला, श्री. अमोल मेश्राम, श्री. प्रशांत पाठक आणि श्री. सचिन शिंदे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. या सर्व अधिकाऱ्यांसह विविध उमेदवारांचे प्रतिनिधीदेखील यावेळी उपस्थित होते. या सर्वांशी श्री. वाघमारे यांनी यावेळी चर्चा केली. प्रभाग क्र. २०१४ ते २२२ साठी एकूम ४६७ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी एकूण ६१० ईव्हीएम सूसज्ज करण्यात येत आहेत.

## महिलांसाठी मुंबई देशातील टॉप ५ शहरांमध्ये
## बेंगळुरू पुन्हा एकदा अव्वल!



**मुंबईची कामगिरी : औद्योगिक प्रगती मोठी, पण महागाईचे आव्हान**

या सर्वेक्षणात मुंबईच्या कामगिरीचे दोन पैलू समोर आले आहेत. मुंबईचा 'औद्योगिक समावेशकता निदेर्शांक' तब्बल ६९.०० इतका उच्च आहे, जो महिलांसाठी उपलब्ध असलेल्या मोठ्या प्रमाणावरील रोजगाराच्या संधी दर्शवतो. मात्र, 'सामाजिक समावेशकता' श्रेणीत मुंबई ३८.४४ गुणांसह काहीशी मागे पडली आहे. मुंबईतील घरांच्या वाढत्या किमती आणि वाहतुकीच्या पायाभूत सुविधांवरील ताण ही महिलांसाठी प्रमुख आव्हाने ठरत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

भारतातील महिलांसाठी राहण्यायोग्य आणि करिअरसाठी पोषक शहरांच्या यादीत मुंबईने आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. प्रसिद्ध 'वर्कप्लेस कल्चर' कन्सल्टिंग फर्म 'अवतार ग्रुप' तर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'टॉप सिटीज फॉर विमेन इन इंडिया' २०२५ च्या अहवालात मुंबईने ५ वे स्थान पटकावले आहे. या यादीत कर्नाटकची राजधानी बेंगळुरूने आपले पहिले स्थान कायम राखले आहे.

**टॉप १० शहरांची क्रमवारी**

२०२५ च्या या अहवालात १२५ शहरांचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये खालील शहरांनी बाजी मारली आहे:

१. बेंगळुरू (५३.२९ गुण)
२. चेन्नई (४९.८६ गुण)
३. पुणे (४६.२७ गुण)
४. हैदराबाद (४६.०४ गुण)
५. मुंबई (४४.४९ गुण)
६. गुरुग्राम,
७. कोलकाता,
८. अहमदाबाद,
९. तिरुवनंतपुरम,
१०. कोईम्बतूर.

**दक्षिण भारताचे वर्चस्व आणि उत्तर भारताची स्थिती**

देशातील महिलांसाठी सर्वात सुरक्षित आणि पोषक वातावरण देणाऱ्या पहिल्या १० शहरांपैकी ५ शहरे दक्षिण भारतातील आहेत. दक्षिण भारताचा सरासरी स्कोर २१.६० इतका असून तो देशात सर्वाधिक आहे. विशेष म्हणजे, उत्तर भारतातून केवळ गुरुग्राम हे एकमेव शहर टॉप १० मध्ये (६ वे स्थान) स्थान मिळवू शकले आहे. दिल्ली, गुरुग्राम आणि नोएडा येथे नोकऱ्या भरपूर असल्या तरी, सुरक्षा आणि सामाजिक निकषांवर ही शहरे मागे आहेत.

**पुणे तिसऱ्या क्रमांकावर; महाराष्ट्राची छाप**

महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट म्हणजे पुणे शहराने ४६.२७ गुणांसह देशात तिसरे स्थान पटकावले आहे. पुण्याने सामाजिक सुरक्षा आणि औद्योगिक वाढ या दोन्ही बाबतीत उत्तम समतोल साधला आहे, असे अहवालात म्हटले आहे.

## पोलिसांकडूनच लोकशाहीला काळिमा, शस्त्रासह उमेदवाराच्या दारात वावर, २ अंमलदार निलंबित

**■अहिल्यानगर। प्रतिनिधी,**

महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत लोकशाहीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाच्या उमेदवाराच्या घरासमोर पोलिस गणवेशात रिव्हॉल्व्हर घेऊन फिरणाऱ्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांवर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. व्हायरल झालेल्या व्हिडीओमुळे संपूर्ण पोलिस यंत्रणाच अडचणीत सापडली असून, शहराच्या राजकारणात प्रचंड खळबळ उडाली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात सुहास शिरसाठ व अन्य दोघांविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणुकीच्या संवेदनशील काळात पोलिसांकडूनच शस्त्रांचा निष्काळजी वापर होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे.

**व्हिडीओ व्हायरल, राजकीय वातावरण तापले**

शिवसेना (ठाकरे गट) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी समाजमाध्यम एक्सवर पोस्ट केलेल्या व्हायरल व्हिडीओत



**कर्तव्यात कसूर, शस्त्र हाताळण्यात हलगर्जीपणा**

अजित पवार राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप यांना सुरक्षा देणारे नीलेश भालसिंग व राघवेंद्र भालसिंग या दोन पोलिस अंमलदारांनी कर्तव्याचे ठिकाण सोडून बोल्हेगाव परिसरात जाणे, तसेच रिव्हॉल्व्हर चुकीच्या व बेफिकीर पद्धतीने हाताळल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. या गंभीर बाबीची दखल घेत जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी तात्काळ निलंबनाचे आदेश दिले.

एका पोलिसाच्या हातात रिव्हॉल्व्हर स्पष्टपणे दिसत असून, तो थेट उमेदवाराच्या घरासमोर उभा असल्याचा आरोप करण्यात आला होता.

हा लोकशाही प्रक्रियेत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न आहे, असा थेट आरोप करताच पोलिस प्रशासनाला कठोर पावले उचलावी लागली.

**खासदार निलेश लंके आक्रमक**

या प्रकाराची गंभीर दखल घेत खासदार निलेश लंके व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)च्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन तातडीच्या व कठोर कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर अवघ्या काही तासांत निलंबनाचे आदेश निघाले.

पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले की 'सुरक्षारक्षक असलेल्या पोलिस अंमलदारांनी शस्त्र निष्काळजीपणे हाताळल्याचे चौकशीत आढळले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असल्याने दोघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.' दरम्यान, व्हिडीओमध्ये दिसणाऱ्या इतर व्यक्तींवरही कारवाई करण्याची मागणी जोर धरत असून, या घटनेमुळे अहिल्यानगरचे राजकारण अधिकच तापले आहे. एका व्हायरल व्हिडीओने पोलिस यंत्रणेला कठोर निर्णय घ्यायला भाग पाडल्याने, ही कारवाई सध्या शहरभर चचेर्चा विषय ठरली आहे.

## पोलिसांकडूनच लोकशाहीला काळिमा, शस्त्रासह उमेदवाराच्या दारात वावर



**कर्तव्यात कसूर, शस्त्र हाताळण्यात हलगर्जीपणा**

अजित पवार राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप यांना सुरक्षा देणारे नीलेश भालसिंग व राघवेंद्र भालसिंग या दोन पोलिस अंमलदारांनी कर्तव्याचे ठिकाण सोडून बोल्हेगाव परिसरात जाणे, तसेच रिव्हॉल्व्हर चुकीच्या व बेफिकीर पद्धतीने हाताळल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. या गंभीर बाबीची दखल घेत जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी तात्काळ निलंबनाचे आदेश दिले.

**■अहिल्यानगर। प्रतिनिधी,**

महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत लोकशाहीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाच्या उमेदवाराच्या घरासमोर पोलिस गणवेशात रिव्हॉल्व्हर घेऊन फिरणाऱ्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांवर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. व्हायरल झालेल्या व्हिडीओमुळे संपूर्ण पोलिस यंत्रणाच अडचणीत सापडली असून, शहराच्या राजकारणात प्रचंड खळबळ उडाली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात सुहास शिरसाठ व अन्य दोघांविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणुकीच्या संवेदनशील काळात पोलिसांकडूनच शस्त्रांचा निष्काळजी वापर होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे.

**व्हिडीओ व्हायरल, राजकीय वातावरण तापले**

शिवसेना (ठाकरे गट) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी समाजमाध्यम एक्सवर पोस्ट केलेल्या व्हायरल व्हिडीओत एका पोलिसाच्या हातात रिव्हॉल्व्हर स्पष्टपणे दिसत असून, तो थेट उमेदवाराच्या घरासमोर उभा असल्याचा आरोप करण्यात आला होता.

हा लोकशाही प्रक्रियेत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न आहे, असा थेट आरोप करताच पोलिस प्रशासनाला कठोर पावले उचलावी लागली.

**खासदार निलेश लंके आक्रमक**

या प्रकाराची गंभीर दखल घेत खासदार निलेश लंके व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)च्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन तातडीच्या व कठोर कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर अवघ्या काही तासांत निलंबनाचे आदेश निघाले.

पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले की 'सुरक्षारक्षक असलेल्या पोलिस अंमलदारांनी शस्त्र निष्काळजीपणे हाताळल्याचे चौकशीत आढळले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असल्याने दोघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.' दरम्यान, व्हिडीओमध्ये दिसणाऱ्या इतर व्यक्तींवरही कारवाई करण्याची मागणी जोर धरत असून, या घटनेमुळे अहिल्यानगरचे राजकारण अधिकच तापले आहे. एका व्हायरल व्हिडीओने पोलिस यंत्रणेला कठोर निर्णय घ्यायला भाग पाडल्याने, ही कारवाई सध्या शहरभर चचेर्चा विषय ठरली आहे.

## शिंदेंच्या शिवसेना कार्यकर्त्यांकडून दहिसरमध्ये दोघांना बेदम मारहाण
## घरात प्रचाराला विरोध केल्याने केलं रक्तबंबाळ

**नेमकं प्रकरण काय?**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना सोमवारी सायंकाळी सुमारे 7 वाजता मुंबईतील दहिसर पूर्वेतील मिठा घर परिसरात घडली. बीएमसी निवडणुकीच्या प्रचारासाठी शिवसेनेचे दोन कार्यकर्ते एका दाम्पत्याच्या घरात थेट आत गेले. घरमालक आणि त्यांच्या पत्नीने याला विरोध करत, "कोणाच्या परवानगीशिवाय घरात कसे प्रवेश करता?" असा सवाल केला. या प्रश्नावरून दोन्ही बाजूंमध्ये जोरदार वाद झाला. वाद वाढत गेल्यानंतर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी घरमालकाला मारहाण केल्याचा आरोप आहे. पतीला वाचवण्यासाठी पत्नी मध्ये पडली असता, तिलाही मारहाण करण्यात आली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, यानंतर त्या दोन कार्यकर्त्यांनी इतर शिवसैनिकांना फोन करून बोलावले.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईत बीएमसी निवडणूक प्रचारादरम्यान घडलेल्या एका धक्कादायक घटनेमुळे राजकीय वातावरण तापले आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या १० कार्यकर्त्यांविरोधात पोलिसांनी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले आहेत. घरात जबरदस्तीने प्रवेश केल्याचा जाब विचारणाऱ्या दाम्पत्यावर शिवसैनिकांनी हल्ला केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात महिलेशी गैरवर्तन आणि मारहाणीचे आरोप असून, घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

**लाथा बुक्क्यांनी मारहाण आणि...**

थोड्याच वेळात आणखी काही शिवसैनिक घटनास्थळी पोहोचले. घरमालक बाहेर येताच, सर्वांनी मिळून त्याला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. काठीने मारल्याचाही आरोप आहे. ही संपूर्ण घटना परिसरातील काही नागरिकांनी मोबाईलमध्ये चित्रीत केली होते.

या घटनेनंतर पीडित घरमालकाने एमएचबी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहिता अंतर्गत कलम ३५२ (मारहाण), ७४ (महिलेची लज्जा भंग) तसेच इतर



संबंधित कलमांखाली एकूण १० शिवसैनिकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आतापर्यंत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, उर्वरित आरोपींची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

या प्रकरणामुळे निवडणूक प्रचाराच्या पद्धतींवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. पोलिसांनी सांगितले की, उर्वरित आरोपींनाही लवकरच अटक केली जाईल. व्हायरल व्हिडिओ आणि साक्षीदारांच्या आधारे तपास वेगाने सुरू असून, कायद्यापुढे कोणीही मोठा नाही, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे. या घटनेमुळे राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली असून, पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# आव्हान प्रकल्पपूर्तीचे



**लाखो प्रवाशांच्या वाढत्या संख्येचा विचार करून रेल्वे मंत्रालय आणि एमआरव्हीसीने विविध प्रकल्प हाती घेतले आहेत. मात्र रेल्वेमार्गालगत झालेली अतिक्रमणे, जमीन उपलब्धता आणि अधिग्रहण यामुळे काही प्रकल्प रखडले आहेत. यामुळे प्रवाशांना गदीर्तून धक्के खात प्रवास करावा लागत आहे.**

मुंबई उपनगरीय रेल्वेवर विविध पायाभूत सेवासुविधा निर्माण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने १९९९ मध्ये मुंबई रेल्वे विकास महामंडळाची (एमआरव्हीसी) स्थापना केली. नवीन लोकल, रेल्वेमार्ग उभारणे, रेल्वे स्थानकांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी एमआरव्हीसीवर सोपविण्यात आली. प्रकल्पांसाठी केंद्र सरकार ५० टक्के आणि राज्य सरकार ५० टक्के निधी उपलब्ध करून देते. या निधीतून पश्चिम आणि मध्य रेल्वेच्या उपनगरीय विभागात विविध कामे पूर्ण करण्यात आली आहेत, तर काही कामे प्रगतिपथावर आहेत. एमआरव्हीसीने हाती घेतलेले प्रकल्प राबविण्यात अनेक अडचणी येत असल्या तरी त्यावर मातही केली आहे. परंतु काही प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात अडथळे आहेत. एमआरव्हीसीच्या स्थापनेनंतर मुंबईकरांचा रेल्वे प्रवास वेगवान करण्यासाठी मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रकल्पाच्या (एमयूटीपी) विविध योजना तयार केल्या. या योजनेत नवीन लोकल, नवीन मार्गिका, रेल्वे रुळाजवळ बॅरिकेट, मार्गिका वाढविणे, स्थानकांचा कायापालट, नवीन स्थानके निर्माण करणे असे विविध प्रस्ताव तयार केले. एमआरव्हीसीने तयार केलेल्या एमयूटीपी १ टप्प्याला २००३-०४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली. या टप्प्यात कुर्ला-ठाणे पाचवी, सहावी मार्गिका, बोरिवली-विरार तिसरी आणि चौथी मार्गिका, ९ डब्याच्या १०१ नवीन लोकल, प्रकल्पात बाधित होणाऱ्या १५ हजार ८५७ नागरिकांचे पुनर्वसन अशी विविध कामे मार्गी लावली. एमयूटीपीचा पहिला टप्पा मार्च २०१२ मध्ये पूर्ण झाला. यामुळे पश्चिम-मध्य रेल्वेमार्गावर १२ डब्याच्या लोकल सुरू झाल्याने प्रवाशांना गदीर्पासून काही प्रमाणात दिलासा मिळाला. एमयूटीपी १ मधील प्रकल्प मार्गी लागत असतानाच एमआरव्हीसीच्या एमयूटीपी २ टप्प्याला २००८-०९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली. या टप्प्यात ठाणे-दिवा पाचवी, सहावी मार्गिका आणि अंधेरी ते गोरेगाव दरम्यान हार्बर मार्ग विस्तार करण्याचे काम पूर्ण झाले आहे, तर मुंबई सेंट्रल-बोरिवली सहावी मार्गिका, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते कुर्ला दरम्यानच्या पाचव्या- सहाव्या मार्गिकेचे काम प्रगतिपथावर आहे. सीएसएमटी ते कुर्ला पाचवा व सहावा मार्ग प्रकल्पाचा खर्च अंदाजे ८९१ कोटी रुपये आहे. हा प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे. टप्पा १ मध्ये परळ ते कुर्ला हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. हा प्रकल्प डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य होते. मात्र जुने पूल आणि रेल्वे रुळालगतच्या झोपडपट्टीतील नागरिकांचे पुनर्वसन करण्यात विलंब झाल्याने आणखी काही महिने या प्रकल्पाची प्रतीक्षा प्रवाशांना करावी लागणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील परळ ते सीएसएमटी प्रकल्प जागेअभावी रखडला आहे. सध्या लांब पल्ल्याच्या मेल-एक्स्प्रेस गाड्या जलद मार्गावरून चालविण्यात येत असल्याने जलद लोकल सेवेवर परिणाम होत आहे. यामुळे याचा फटका मध्य रेल्वे प्रवाशांना सोसावा लागत आहे. एमयूटीपी ३ टप्प्याला २०१६ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली. या टप्प्यात पनवेल-कर्जत उपनगरीय कॉरिडॉर, ऐरोली- कळवा उन्नत मार्ग, विरार-डहाणू रोड मार्गिकेचे चौपदरीकरण अशी महत्त्वाची कामे हाती घेण्यात आली आहेत. पनवेल-कर्जत नवीन मार्गिकेचे काम २०२२-२३ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते, तर ऐरोली-कळवा उन्नत मार्ग २०२१-२२ मध्ये पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. विरार-डहाणू रोड मार्गिकेचे चौपदरीकरणाचे काम २०२२-२३ मध्ये पूर्ण होणार होते. मात्र ही कामे सध्या प्रगतिपथावर आहेत, तर लोकलमधून पडून होणारे अपघात रोखण्यासाठी स्वयंचलित दरवाजाची लोकल या टप्प्यात सुरू करण्यात येणार होती. ही लोकल नवीन वर्षात सुरू होणार आहे. एमयूटीपी ३ ए टप्प्यात हार्बर मार्गिकेचा विस्तार गोरेगाव-बोरिवलीपर्यंत करण्यात येणार आहे. बोरिवली-विरार दरम्यान पाचवी, सहावी मार्गिका, कल्याण-आसनगाव दरम्यान चौथी मार्गिका, कल्याण-बदलापूर दरम्यान तिसरी आणि चौथी मार्गिका, तर लांब पल्ल्याच्या आणि उपनगरीय लोकलसाठी कल्याण यार्डची कामे प्रगतिपथावर आहेत. तसेच वातानुकूलित रेक उपनगरीय रेल्वेच्या ताफ्यात येणार आहेत. गोरेगाव-बोरिवली हार्बर मार्गिका विस्तार प्रकल्प ८९८ कोटी खर्चाचा असून सध्या या प्रकल्पासाठी भूमिसंपादनाचे काम प्रगतिपथावर आहे. हा प्रकल्प गोरेगाव ते मालाड दरम्यान मार्च २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे, तर मालाड ते बोरिवली विभागात डिसेंबर २०२८ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. विरार-डहाणू तिसरा व चौथा मार्ग प्रकल्प डिसेंबर २०२६ मध्ये पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. पनवेल-कर्जत उपनगरीय प्रकल्प, कल्याण-आसनगाव ४ था मार्ग प्रकल्प येत्या काही महिन्यांत पूर्ण होणार असल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबई महानगर प्रदेशचे झपाट्याने नागरीकरण झाले आहे. येथील नागरिक नोकरीधंद्यानिमित्त दक्षिण मुंबईत मोठ्या संख्येने येतात. प्रवासासाठी हे नागरिक लोकल सेवेवर अवलंबून आहेत. यामुळे लोकलवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. गर्दीच्या वेळी लोकलमध्ये पाय ठेवण्यास जागा नसल्याने लोकलमधून पडून आणि रेल्वे रूळ ओलांडताना अनेकांना जीव गमवावा लागत आहे. प्रवाशांच्या वेगवान आणि सुरक्षित प्रवासासाठी हाती घेतलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचे आव्हान एमआरव्हीसी आणि रेल्वे प्रशासनासमोर आहे. परंतु महत्त्वाच्या प्रकल्पांची रखडपट्टी झाल्यास लोकल प्रवाशांना हालअपेष्टा सहन करत लोकलमधून प्रवास करावा लागणार आहे.

# भांडा, लढा, मतदार मानसिकतेशी खेळा!




राज्यातील सत्ताधाऱ्यांमधील सतत चालणारी भांडणं आणि आघाड्यांचे फेरबदल हा मतदारांच्या मानसिकतेशी खेळण्याचा जुना आणि परिचित मार्ग आहे; पुणे व पिंपरी चिंचवडसारख्या ठिकाणी पक्ष एकत्र येऊनही अंतर्गत मतभेद स्पष्ट होतात.

राज्यात सत्तेसाठी एकत्र आलेले पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत एकामेकांशी कडाकडा भांडतात यात नाविन्य नाही. असे भांडणे त्यांच्याच पथ्यावर पडले आहे. गेल्या २०-२५ वर्षांचा इतिहास चाळला तर अशी उदाहरणे अनेक सापडतील.

२००१-०२ मध्ये जिल्हा परिषद निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रातील साखर पट्ट्यात काँग्रेसने आपल्याला अधिक मोकळीक द्यावी अशी राष्ट्रवादी काँग्रेसची इच्छा होती. हा भाग राष्ट्रवादीच्या वर्चस्वाचा असला तरी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख काँग्रेसचे महत्त्व कमी होऊ देण्यास तयार नव्हते. आपल्या उमेदवारांसमोर राष्ट्रवादीचे बंडखोर उभे आहेत असे काँग्रेसचे म्हणणे होते. तर देशमुख यांची वृत्ती हुकुमशाही आहे, असे शरद पवार तेव्हा म्हणाले होते. प्रत्युत्तर म्हणून काँग्रसने राष्ट्रवादीचे वर्णन सत्तालालसा असलेल्यांचा पक्ष असे केले होते.

२००२ मध्ये मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या काळात राष्ट्रवादीचे वर्चस्व असलेल्या भागात काँग्रेसने उमेदवार उभे करण्यावरूनही पवार संतापले होते. ही एकतर्फी आत्महत्या आहे असे त्यांनी म्हणताच काँग्रेस नेते मुरली देवरा यांनी पवारांचे वर्णन अविश्वासार्ह नेते असे केले होते. तत्कालीन उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनीही काँग्रेस जागा सोडत नाही म्हणून संताप व्यक्त केला तेव्हा काँग्रसने राष्ट्रवादीचा उल्लेख संधीसाधू असा केला.

२००५ मध्येही काही नगरपालिका निवडणुकांदरम्यान या दोन पक्षात चकमक घडली. आपले लोक फोडण्याचे काम राष्ट्रवादी करत असल्याचा आरोप काँग्रेसमध्ये नव्यानेच आलेल्या नारायण राणे यांनी केला. स्थानिक आघाडी तोडण्याची धमकीही त्यांनी दिली होती. पण ती तेवढ्यापुरतीच राहिली. पुढे विधानसभा निवडणुका दोन्ही पक्षांनी एकत्रित लढविल्या, सत्तेतही आले. पण आता मतदार कसा विचार करतात, त्याचे प्रतिबिंब मतदानाच्या वेळी कसे उमटते यावर सारे अवलंबून आले.

आता गेले काही दिवस उपमुख्यमंत्री अजित पवार व भाजपा नेत्यांमधील शाब्दिक युद्ध लक्षवेधी ठरत आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत उत्तम कामगिरी करता यावी यासाठी त्यांनी शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला सोबत घेतले आहे. राष्ट्रवादीच्या दोन गटात विखुरले गेलेले स्थानिक पुढारी पवार कुटुंबाचे भक्त असल्याने आणि पुणे परिसरात दृष्य, अदृष्य स्वरूपात सर्वत्र त्यांचा वावर असल्याने दोन्ही बाजूने युतीचा आग्रह झाला असण्याची शक्यता अधिक आहे.

जमीन खरेदी प्रकरण बाहेर आल्याबरोबर; पार्थ (पवार) असे काही करेल असे मला वाटत नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार आणि या पक्षाच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे मुंढवा म्हणाल्या. तेव्हाच पुणे परिसरात पवार कुटुंबियांच्या भरवशावर राजकारण करणारांची मने गद्गद झाली असणार. महानगरपालिकेसाठी एकत्र येण्याची सुरुवात इथेच झाली असे म्हटले तर चूक ठरणार नाही.

समोर भाजपा स्वतंत्र लढत देत आहे. भाजपा आणि राष्ट्रवादी एकत्रित पवार यांना पुण्यावर वर्चस्व ठेवायचे आहे. खरेतर हे दोघे अनोख्या ह्यपुणे पॅटर्नह्वचे जनक. महापालिकेत काँग्रेसला सत्तेबाहेर ठेवण्यासाठी २००९-१० मध्ये भाजपा आणि राष्ट्रवादी एकत्र आले होते. आताही दोघांना समन्वयानेच पुणे व पिंपरी चिंचवडचा कारभार करायचा आहे. पुढेमागे पुणे महानगर परिसराच्या 'व्यापक हिता'साठी एकामेकांना मदतही करायची आहे. तिसरा भिडू ताकदवान होऊ नये, यासाठी पुरेपूर काळजी घेत निवडणुकीची पटकथा तयार झाली असणार हे मानण्यास जागा आहे.

काँग्रेस, ठाकरे बंधू व एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांना वेशीबाहेर थांबवायचे असेल तर अधिकाधिक मतदारांसमोर आपलीच प्रतिमा दिसली पाहिजे याची काळजी घेण्याची सुरुवात भांडण सुरू करून झाली आहे. अजित पवार यांनी पुणे व पिंपरी चिंचवडचा भाजपाचा कारभार कसा होता, यावर तोंड उघडताच बिचकलेल्या सवंगड्याने पवारांचा इतिहास काढायला सुरुवात केली.

विषय ७० हजार कोटींच्या कथित सिंचन घोटाळ्यापर्यंत गेला आहे. आपल्याला ज्या विषयामुळे राजकीय संकटात टाकले गेले व ज्यामुळे पाणउतारा सहन करावा लागला त्याची परतफेड कधीतरी करावीच लागेल, असे अजित पवार यांना वाटलेच असणार. त्यातून ते बोलून गेले की, आरोप तर माझ्यावर पण झाले होते ना. पण ज्यांनी केले त्यांच्याच सोबत मी सत्तेत आहे. यावर भाजपा प्रचंड अस्वस्थ होणार हे ओघानेच आले. पवार एकटे बोलले पण विजापूरच्या प्रसिद्ध गोल घुमट येथे एकदा दिलेल्या आवाजाचा अनेकदा प्रतिध्वनी निघतो तशा भाजपाच्या ४-५ बड्या नेत्यांच्या प्रतिक्रिया आल्या.

खरे तर अजित पवार यांनी एकदा मनमोकळेपणे काही गोष्टी राज्याला सांगितल्याच पाहिजेत. ते जलसंपदा मंत्री असताना कोणकोणत्या पक्षाच्या नेत्यांनी त्यांना कोणकोणत्या प्रकल्पाची कामे करण्याचा हट्ट धरला, सुरू असलेल्या प्रकल्पाचा विस्तार करा म्हणून कंत्राटदारासह भेटून कोणी कोणी गळ घातली, फारशी गरज नसतानाही कोणाच्या आग्रहास्तव कोणत्या प्रकल्पाचा विस्तार केला, कोणाच्या मतदारसंघाला फायदा व्हावा व राजकीय बस्तान बसविण्यास मदत व्हावी म्हणून सहकार्य केले, कोणाच्या भागात कोणत्या कंत्राटदारांना कामे दिली, त्यातून कोणाचा फायदा झाला हे जर ते बोलले तर राज्याच्या ज्ञानात बरीच भर पडेल.

त्यांच्याकडे बहुदा अनेकांनी तेव्हा दिलेल्या पत्रांच्या छायाप्रती सुद्धा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे सारे खुले करण्याने चुकांचे परिमार्जन होईल का हे जनता ठरवेल; पण ज्यांच्यासाठी म्हणून आपण सार्वजनिक जीवनात वावरतो त्यांच्यासाठी हे सारे बाहेर आले पाहिजे. हा विषय महानगरपालिका निवडणुकांनंतर संपला तर मात्र 'विषय अजून न्यायालयात प्रलंबित आहे', हे भाजपा मंत्र्यांनी उच्चारलेले वाक्य महत्त्वाचे ठरले, असे म्हणावे लागेल.

सध्या तरी अजित पवार बोलत राहतील व भाजपा त्याला उत्तर देत राहील अशीच चिन्हे आहेत. मतदारही प्रामुख्याने या दोघांतच विखुरला जाईल. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत यश मिळाले की, त्याचा फायदा विधानसभा, लोकसभेला होतो. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकात स्वबळावर सत्तेत आल्यास भाजपाला राष्ट्रवादीची गरज भासणार नाही. पवारांचे वर्चस्व वाढावे हा भाजपाचा राजकीय कार्यक्रम असू शकत नाही. तरीही राष्ट्रवादीची कामगिरी उजवी राहिली तर फरक पडेल.

हेच भाजपाने ठाणे जिल्ह्यातील महापालिका व नगरपालिकांत ठरविले आहे. ते केल्याशिवाय एकनाथ शिंदे व त्यांच्या शिवसेनेची गरज कमी करता येत नाही. याचाच एक भाग म्हणून शिंदे यांचे सुपुत्र श्रीकांत खासदार असलेल्या कल्याण लोकसभा मतदारसंघातील निवडणुकांकडे भाजपाचे बारीक लक्ष आहे. अंबरनाथ येथे काँग्रेसला सोबत घेण्याचा निर्णय उगाच होत नाही. भाजपाच्या राज्यस्तरीय नेतृत्वाने परवानगी दिल्याशिवाय स्थानिक पातळीवर काँग्रेससोबत सत्तेसाठी आघाडी स्थापन होत नसते. पक्ष संघटना मजबूत असताना परस्पर काही होत नाही.

ठाण्यात आणि मुंबईत मात्र शिंदे सेनेला असे धक्के देता येत नाहीत. एकतर ठाकरे बंधूंशी लढायचे आहे. त्यासाठी शिंदे यांच्याकडे असलेले सेना नेते कामाला येणार आहेत. बाजूला मिरा-भाइंदर महापालिकेवर ताबा असावा म्हणून तिथेही नरेंद्र मेहता व प्रताप सरनाईक यांच्यात वादविवाद सुरू आहेच. सत्ताधाऱ्यांतील भांडणाकडे मतदारांचे लक्ष केंद्रीत झाले तर विरोधक दुर्लक्षित राहतात. राजकीय तडजोड ही निरंतर चालणारी प्रक्रिया असते.

# नववर्षी जगाच्या नकाशावर भारत कुठे?

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकिर्दीला एक वर्ष पूर्ण होत आहे. या कालावधीत त्यांनी जगाच्या अर्थकारणाला झळ पोहोचवत आयात शुल्कात वाढ, माल आयात करण्यावर संख्यात्मक नियंत्रणे, व्हिसा देण्यावर निर्बंध अशी अनेक धोरणे जाहीर केली. त्यामुळे जागतिक व्यापाराला फटका बसला. अमेरिकेची अर्थव्यवस्था ३.२ टक्के गतीने वाढेल, अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात ती ४.३ टक्क्यांनी वाढत आहे.

अमेरिकेतील उपभोग खर्चात वाढ झाली असून, निर्यातही लक्षणीयरीत्या वाढली आहे. ट्रम्प प्रशासनाने संरक्षण क्षेत्रावरील खर्च वाढवला असून, त्यामुळे त्या क्षेत्राचा विकासदर आणि रोजगारनिर्मिती वाढली आहे. मुख्य म्हणजे बहुतेक देशांमधील आयात महाग झाल्यामुळे अमेरिकेचा आयातीवरील खर्च कमी झाला. अमेरिकेतील देशांतर्गत मागणी कमी झाली असली, तरी ही उणीव वाढती निर्यात आणि संरक्षण क्षेत्राचा विस्तार यातून भरून निघाली. त्यामुळे सप्टेंबर २०२५ मध्ये संपलेल्या तिमाहीमध्ये अमेरिकेतील व्यक्तिगत उपभोग खचार्चा किंमत निदेर्शांक २.८ टक्क्यांनी वाढला. त्या अगोदरच्या तिमाहीमध्ये तो २.१ टक्क्यांनीच वधारला होता. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची भरभराट होणे भारताच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हिताचे आहे, कारण त्यामुळे भारतातील तंत्रज्ञान व सेवा उद्योगाची मागणी वाढते. शिवाय अमेरिकेतून भारतात येणाऱ्या रेमिटन्सेसमध्ये, म्हणजे पैशाच्या ओघातही वाढ होते. अमेरिकेने भारतावरील आयात शुल्कात वाढ केली असली, तरी सरलेल्या नोव्हेंबरमध्ये भारतातून जहाजाने जाणाऱ्या मालाच्या निर्यातीत वाढ झाली. जेम्स अँड ज्वेलरी जडजवाहीर आणि सुवर्णालंकार यांच्या निर्यातीमध्ये लक्षणीय वाढ झाली तसेच औषधे आणि इलेक्ट्रॉनिक्स शुल्कवाढ अद्याप लागू झालेली नाही. त्यामुळे या क्षेत्रांना अमेरिकी निर्बंधांचा तसा फटका बसला नाही. भारत आणि अमेरिकेतील व्यापार करारावर चर्चा सुरू होऊन बरेच महिने लोटले आहेत. मध्यंतरी, अमेरिकेने व्यापार कराराची चर्चाच खंडित केली होती. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्यामुळे २५ टक्के दंडही आकारण्यात आला होता. अमेरिकेने लादलेले २५ टक्के शुल्क रद्द करावे, अशी भारताची मागणी आहे. भारताच्या मागण्या अमेरिका मान्य करेल आणि येत्या जानेवारीतच दोन्ही देशांमध्ये करार होईल, अशी अपेक्षा भारताचे वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी व्यक्त केली. या मागण्या मान्य झाल्यास, भारतीय कंपन्यांना अमेरिकेकडून नवीन ऑर्डर्स मिळतील. त्यामुळे भारतात अधिक डॉलर्स येतील, देशांतर्गत रोजगारनिर्मिती वाढेल, त्याचप्रमाणे घसरलेला रुपयादेखील मजबूत होऊ शकेल.

सुदैवाने भारताची रशियासोबत मुक्त व्यापार करारासाठीची चर्चा प्रगतिपथावर आहे. त्याचबरोबर रशिया, आर्मेनिया, बेलारूस, कझाकिस्तान आणि किर्गिस्तान हे देश मिळून झालेल्या युरेशियन इकॉनॉमिक युनियनशीही भारत मुक्त व्यापार करार करणार आहे. हा करार प्रत्यक्षात उतरेल, तेव्हा भारताच्या आयात-निर्यात व्यापारात उल्लेखनीय वाढ होऊ शकते. केवळ रशियाबरोबरच भारताचा व्यापार ६८ अब्ज डॉलरइतका असून, २०३० पर्यंत हा आकडा शंभर डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट दोन्ही देशांनी ठरवले आहे. युक्रेन युद्ध संपवण्यात अमेरिकेला यश आलेले नाही. २०२६ मध्ये हे युद्ध समाप्त करण्यास अमेरिकेला यश आल्यास युक्रेनमधील अमेरिकेची गुंतवणूक वाढेल. हा करार युक्रेनपेक्षा अमेरिका आणि रशियाच्या दृष्टीने फायद्याचा असेल, अशी शक्यता आहे. मात्र ते काहीही असले, तरी युक्रेन त्याचप्रमाणे गाझापट्टीत शांतता निर्माण होणे हे जागतिक व्यापार तसेच भारताच्याही दृष्टीने लाभदायक ठरणार आहे. विकास, लोकशाही आणि सुरक्षा एकमेकांना पूरक असतील, तर भारत केवळ आपल्या नागरिकांसाठी चांगले भविष्य निर्माण करू शकणार नाही, तर एकविसाव्या शतकातील जागतिक व्यवस्थेत एक निर्णायक शक्ती म्हणून उदयास येईल. आज भारत केवळ एक विकसनशील देश नाही, तर जागतिक धोरणनिर्मितीत सक्रिय सहभागी आहे. 'जी २०', 'क्वाड' आणि 'ब्रिक्स' संघटनांमध्ये जागतिक दक्षिणेचा आवाज म्हणून भारताची भूमिका वाढली. एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात भारत अशा टप्प्यातून जात आहे, जिथे विकास, राजकारण आणि राष्ट्रीय सुरक्षा एकमेकांशी खोलवर जोडलेले आहे. आज, भारत एक उदयोन्मुख जागतिक शक्ती, वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि राजकीयदृष्ट्या सक्रिय लोकशाहीदेखील आहे. २०२६ हे वर्ष भारतासाठीही महत्त्वाचे आहे. कारण या काळात सरकारच्या अनेक दीर्घकालीन धोरणांची, अंतर्गत सुरक्षा ध्येयांची आणि राजकीय धोरणांची परीक्षा घेतली जाईल.

आज रस्ते, एक्स्प्रेस वे, रेल्वे आधुनिकीकरण, नवी बंदरे आणि विमानतळ उभारणी यांनी भारताची अंतर्गत कनेक्टिव्हिटी आणि गुंतवणूक आकर्षण मजबूत केले आहे. डिजिटल पेमेंट सिस्टीम, आधार-जन धन-मोबाइल त्रिमूर्ती आणि सरकारी सेवांचे डिजिटलायझेशन हे भारताच्या विकासाच्या कथेला वेगळे करतात. सुरक्षा दलांच्या कडक कारवाईसह, रस्ते, शाळा, आरोग्य केंद्रे आणि रोजगार योजनांच्या बांधकामामुळे पूर्वी जवळपास अनुपस्थित राहिलेल्या क्षेत्रात आता सरकारची उपस्थिती मजबूत झाली आहे. हा बदल केवळ लष्करी नाही, तर प्रशासकीय आणि सामाजिकही आहे. २०२६ पर्यंत दहशतवादी कारवाया कमी करण्याची सरकारची योजना आहे. त्यामुळे पर्यटन, अर्थव्यवस्था आणि स्थानिक जीवन सामान्य होईल. भारताची प्रगतीगाथा केवळ यशाची माहिती नाही. हा संधी आणि आव्हानांचा संगम आहे. आर्थिक विकासाला सर्वसमावेशक बनवणे, सुरक्षेचे चिरस्थायी शांततेत रूपांतर करणे, राजकारणाला संघषार्तून निराकरणाकडे वळवणे आणि मजबूत आणि संतुलित लोकशाही राखणे हे भारताच्या यशाचे मापदंड असतील. भारत नक्षलवाद आणि काश्मीर दहशतवादासारख्या खोल अंतर्गत सुरक्षा धोक्यांवर मात करेल तेव्हा त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय स्तरावर खोलवर होईल. यामुळे भारत एक सुरक्षित, स्थिर आणि गुंतवणूक-अनुकूल राष्ट्र म्हणून स्थापित होईल. रोजगार आणि विकास, निर्वासित/नागरिकत्व कायदे, स्थानिक ओळख आणि सामाजिक समिकरणांशी संबंधित जुने वादविवाद हे आता सुधारणेसाठी प्रमुख मुद्दे असतील.

# जुने ते 'सोने'



असे म्हटले जाते की, एखादे सूत्र एक वर्तुळ फिरून पुन्हा त्याच ठिकाणी येत असते. तसाच प्रकार सध्या सोन्याच्या संदर्भात घडतांना दिसू लागला आहे. भारतच नाही, तर संपूर्ण जगात खरेदी-विक्री करण्यासाठी प्राचीन काळापासून वेगवेगळ्या चलनांचा वापर करण्यात येत होता. काळ आणि परिस्थिती यांनुसार त्यात पालट होत गेला. सध्याच्या काळात आपण कागदी चलनांचा वापर जगभरात करत आहोत. प्रत्येक देशाच्या चलनाचे नाव आणि मूल्य वेगवेगळे आहे. पूर्वीच्या काळात भारतात खेडेगावांमध्ये कोणतेही चलन वापरले जात नव्हते. बारा बलुतेदारांच्या संदर्भात असे होते की, शेतर्कयाने धान्य देऊन लोहाराकडून औजारे घ्यावी, तर नाभिकाने अन्य बलुतेदारांकडून त्यांच्याकडे असलेले साहित्य घेऊन त्यांचे केशकर्तन करावे. पुढे तांब्याची नाणी, चांदीची नाणी, सोन्याची नाणी, कवडी आदी प्रकारची चलने वापरली जाऊ लागली. जेव्हा कागदाचा शोध लागला, तेव्हा कागदी चलन चालू झाले. उद्या समजा कागदी चलन ठप्प झाले, तर चलन म्हणून काय वापरले जाणार? यासाठी अधिकृतरित्या जगाकडे कोणताही पर्याय शिल्लक राहिलेला नाही. अशा वेळी सोने हा धातू पुन्हा एकदा गुंतवणूक आणि चलन म्हणून वापरता येऊ शकणारा धातू ठरणार आहे. यामुळेच जगभरातील देश सोन्याचा साठा करू लागले आहेत. सोन्याची मागणी वाढल्याने त्याचे दरही वाढत चालले आहेत. भारतात कधीकाळी ४ आकडी रकमेत मिळणारे सोने आज ६ आकडी रकमेपर्यंत पोचले आहे. सध्याच्या सोन्याचा दर १० ग्रॅम म्हणजे १ तोळ्याला १ लाख ३४ सहस्र रुपये इतका झाला आहे. चांदीच्याही दरात वाढ झाली आहे. ही वाढ चढती रहाणार असून वर्ष २०३० पर्यंत सोने ७ लाख रुपयांपर्यंत महाग होणार असल्याचे म्हटले जात आहे. आज ज्याच्याकडे कोट्यवधी रुपये आहेत, तेही सोन्याची खरेदी करू लागले आहेत, तर सर्वसामान्य नागरिक सोने खरेदी करू शकत नसल्याचेही चित्र आहे. सर्वसामान्य नागरिक विवाहाच्या वेळीच बहुतेक वेळा सोने खरेदी करत असतो. त्यामुळे विवाहाच्या खर्चावर मयार्दा येऊ लागल्या आहेत. भारतीय परंपरेत सोने हे केवळ धन नसून ते 'स्त्रीधन' आणि 'आणीबाणीचा आधार' मानले जाते; मात्र आजच्या दरांमुळे सामान्य कुटुंबांना सण-उत्सव आणि विवाह सोहळा यांसाठी कर्ज काढावे लागत आहे. लग्नसराईत दागिन्यांचे वजन अल्प करूनही मूल्य आवाक्याबाहेर जात आहे, ही चिंतेची गोष्ट आहे. सोन्याचे दर वाढणे, ही केवळ एक आर्थिक घटना नसून ती आगामी आपत्काळाची पूर्वसूचना आहे. अनेक संतांनी भाकीत केल्याप्रमाणे येणारा काळ हा भीषण महायुद्धाचा आणि नैसर्गिक आपत्तींचा असू शकतो. अशा काळात कागदी चलनाला काहीही मूल्य उरणार नाही, तिथे केवळ 'सुवर्ण'च विनियोगाचे साधन म्हणून टिकून राहील. सोन्याच्या भाववाढीमुळेच आपत्काळ येणार हे नक्की झालेले आहे. आता प्रश्न तो आज येणार कि उद्या येणार? इतकाच आहे. जेव्हा कधी तो येईल, तेव्हा लोकांच्या हातात पैसे नसतील; कारण आपत्काळात आर्थिक स्थिती बिकट होईल आणि सरकार बँका बंद ठेवू शकते. वीज गेल्यास ऑनलाईन व्यवहार ठप्प होतील. इंटरनेट ठप्प झाल्यास सर्वच संपर्क बंद पडेल. अशा स्थितीत कागदी चलन हातात नसेल, तेव्हा सोने, चांदी आदी धातूंचाच व्यवहारासाठी वापर करावा लागणार आहे. याला सामोरे जाण्यासाठी जर सोने नसेल, तर अशी व्यक्ती केवळ देवाच्या कृपेवर तरून जाऊ शकते. देवाची कृपा होण्यासाठी देवाची भक्ती आणि साधना करणे आवश्यक आहे. असे किती जण देवाची भक्ती करतात की, देव त्यांना आपत्काळात रक्षण करून त्यांना त्यातून सुखरूप बाहेर काढेल?

### जागतिक घडामोडींचा परिणाम

रशिया-युक्रेन युद्ध असो किंवा इस्रायल-हमास संघर्ष, जगभरात सध्या युद्धाचे ढग दाटले आहेत. जेव्हा जेव्हा जगात युद्धाची स्थिती निर्माण होते, तेव्हा चलनाचे मूल्य घसरते. अशा काळात सुरक्षित गुंतवणूक म्हणून जगातील सर्वच देशांच्या मध्यवर्ती बँका आणि मोठे गुंतवणूकदार सोन्याकडे वळतात. ही 'सुरक्षित आश्रयस्थान' शोधण्याची वृत्ती सोन्याचे दर वाढवत आहे. जागतिक बाजारपेठेत अमेरिकी डॉलरचा प्रभाव अल्प होत आहे. अनेक देश आता व्यापारासाठी डॉलरऐवजी स्वतःच्या चलनाचा किंवा सोन्याचा आधार घेत आहेत. अमेरिकेतील महागाई आणि तेथील बँकिंग क्षेत्रातील अस्थिरता यांमुळे गुंतवणूकदारांचा डॉलरवरील विश्वास उडाला असून त्यांनी सोन्यात गुंतवणूक करणे पसंत केले आहे. भारत, चीन आणि तुकीर्ये यांसारख्या देशांच्या मध्यवर्ती बँकांनी मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी चालू केली आहे. भविष्यातील आर्थिक मंदीचा सामना करण्यासाठी राष्ट्रपुरुषांनी (देशाच्या धुरिणांनी) सोन्याचा साठा करणे, हे सोन्याच्या भाववाढीचे एक मुख्य कारण आहे. सोन्याचे दर गगनाला भिडल्यामुळे समाजात चोर्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे घरातील सोन्याचे रक्षण करण्याऐवजी ते बँकेच्या 'लॉकर'मध्ये (तिजोरीत) ठेवणे किंवा त्याचा विमा उतरवणे हिताचे ठरेल.

### सरकारकडून थेट नियंत्रण नाही

भारत सरकारने सोन्याची खरेदी-विक्री किंवा दर यांवर थेट नियंत्रण लागू केलेले नाही. सरकारचे म्हणणे स्पष्ट आहे. सोन्याचे दर हे जागतिक बाजारपेठेतील पुरवठा-मागणी, चलनवाढ, आर्थिक घडामोडी आणि जागतिक अस्थिरता यांवर आधारित आहेत अन् त्यामुळे सरकार त्यावर थेट नियंत्रण आणू शकणार नाही. सरकारने हे विधान संसदेत स्पष्ट केले आहे. सोने हा भारतासाठी एक मोठा आयातीचा माल आहे. इतिहासात आयात शुल्क वाढवून सरकारने सोन्याच्या आयातीला काही वेळा नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु यामुळेच काही गोष्टींत तस्करी वाढल्याचे तज्ञांचे मत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील सरकारचे धोरण सोन्याचे दर थेट खाली आणणे नाही, तर आयातीवरील अवलंबित्व अल्प करणे, सोन्याचा अधिक उत्पादनक्षम वापर करणे आणि भारतीय रुपया स्थिर ठेवणे, या दिशेने आहे. असे असले, तरी सरकारने सोन्यावर नियंत्रण आणणे आवश्यक आहे, असेच जनतेला वाटते. सरकारच्या अशा धोरणांचा लाभ सर्वसामान्यांना नाही, तर धनाढ्य लोकांनाच होऊ शकतो, असेच चित्र आहे. ही चांगली गोष्ट नाही.

### साधना आणि आत्मबळ वाढवा

सोन्याचा साठा कितीही असला, तरी कठीण काळात केवळ 'साधना' आणि 'ईश्वराचे अधिष्ठान' हेच मनुष्याला तारू शकते. त्यामुळे केवळ बाह्य सोन्याच्या मागे न धावता ईश्वराची कृपा मिळवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

# चटकदार रीव्हर्स वडापाव



**साहित्य :** ४ व्हाइट ब्रेड स्लाइस, बेसन, हिरवी चटणी, लाल सुकी चटणी, ६ पाकळ्या बारीक चिरलेला लसूण, आल्याचा तुकडा ठेचलेला, कढीपत्ता, १ कांदा बारीक चिरलेला, बेकिंग सोडा, हिंग, जिरे, मोहरी, हिरवी मिरची बारीक चिरलेली, मीठ, ४ उकडून कुस्करलेले बटाटे, कोथिंबीर बारीक चिरलेली, तेल.

**भाजीची कृती :** प्रथम पॅनमध्ये १ टेबलस्पून तेल गरम करायला ठेवा. तेल तापले की, त्यात जिरे, मोहरी, कढीपत्ता, हिंग, लसूण, आले, हिरवी मिरची, कांदा व हळद घालून नीट ढवळून एक करा. कांदा लालसर झाला की त्यात कुस्करलेला बटाटा घाला व मिश्रण नीट परतवत राहा. नंतर आवश्यक तेवढे मीठ घाला आणि झाकण ठेवून एक वाफ काढा. मग कोथिंबीर घाला व गॅस बंद करा.

**बेसनाचा घोळ :** एका बाऊलमध्ये बेसन घ्या. त्यात १/२ टीस्पून प्रत्येकी बेकिंग सोडा, हळद व मीठ घाला. आवश्यकतेनुसार पाणी घालून बेसनाचा घोळ तयार ठेवा.

**सँडविच कृती :** ब्रेड स्लाइसच्या कडा कापून घ्या व चार चौकोनी तुकडे करा. एका तुकड्यावर हिरवी चटणी लावा व त्यावर लाल चटणी टाका. दुसरा ब्रेडचा तुकडा त्यावर ठेवा. अशाप्रकारे सर्व सँडविच करून घ्या. आता पॅन गॅसवर गरम करायला ठेवा व त्यात थोडे तेल घालून पसरवा. तेल तापल्यावर तयार छोटे सँडविच दोन्ही बाजूनी भाजून घ्या.

**कृती :** वरील तयार भाजीचे गोळे करून तयार ठेवा. एक गोळा घेऊन हातावर त्याची पाती करा व पातीवर वरील सँडविच ठेवा. वरून दुसरी पाती ठेवा व सँडविच बटाट्यानी नीट बंद करून हलक्या हाताने दाबा. अशाप्रकारे सर्व सँडविचचे वडे तयार करून घ्या. कढईत तळण्यासाठी मध्यम आचेवर तेल तापायला ठेवा. आता प्रत्येक वडा बेसनाच्या घोळात बुडवून तेलात तळून घ्या व मधून कापून चटणी किंवा सॉसबरोबर गरम गरम सर्व्ह करा.

# केसांना तेल लावताना घ्या 'ही' काळजी

केसांचं आरोग्य जर निरोगी राखायचं असेल तर त्यांची नीट काळजी घेणं गरजेचं आहे. लांबसडक, काळेभोर केस असावेत अशी प्रत्येक तरुणीची इच्छा असते. मात्र असे केस मिळवण्यासाठी केसांना दररोज तेल लावणं गरजेचं आहे. केसांना दररोज तेल लावल्यामुळे केसांची मुळं मजबूत होतात. त्यासोबतच डोक्यावरील त्वचेसाठीही तेल तितकंच गरजेचं असतं. तेलामुळे डोक्यावरील त्वचेला पोषण मिळतं. तसंच रक्तपुरवठाही सुरळीत होतो.

**केसांसाठी**

नारळाचं तेल, बदामाचं तेल किंवा मोहरीचं तेल विशेष गुणकारी असतं. या तेलाचा वापर केल्यामुळे केस काळेभोर आणि घनदाट होण्यास मदत होते. मात्र तेलाचा वापर करताना काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. चला तर मग जाणून घेऊयात तेल लावताना कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात याविषयी -



**डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे**

तेल लावताना डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे विशेष गरजेचं आहे. त्यासोबतच केसांच्या मुळाकडेही तितकंच लक्ष द्यावं लागतं. केसांची मूळ मजबूत असतील तर केसांची वाढ लवकर होते. त्यासोबतच केसांची गळतीदेखील होत नाही. डोक्यावर नारळाच्या तेलाने मसाज केल्यास याचा परिणाम लवकर दिसून येतो.

**रोज केसांना मसाज करावा**

केसांच्या आरोग्यासाठी केसांना केवळ तेल लावणं हा उपाय नाही तर तेल लावण्यासोबतच केसांच्या मुळांना मसाज करणेदेखील गरजेचं आहे. मसाज करण्यासाठी शक्यतो कोमट तेलाचा वापर करावा. कोमट तेलाने मसाज केल्यामुळे केसांची मुळं बळकट होतात.



**तेल लावणं कधीही विसरू नका**

केसांना तेल लावल्यामुळे अनेक वेळा केसांमध्ये चिकटपणा निर्माण होतो, अशी तक्रार महिला वर्गातून येत असते. त्यामुळे अनेक वेळा तरुणी केसांना तेल लावण्याचं टाळतात. मात्र केसांना तेल न लावण्याची चूक कधीही करू नका. केसांच्या वाढीसाठी तेल लावणं महत्त्वाचं आहे. घराच्या बाहेर पडल्यानंतर केसांना धूळ, माती, प्रदूषण या साऱ्या घटकांचा सामना करावा लागतो. त्यामुळे केस कोरडे होतात. परिणामी केसांचं गळण्याचं आणि केस तुटण्याचं प्रमाण वाढतं. या साऱ्या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी केसांना तेल लावणं गरजेचं आहे.

**तेल किंवा शाम्पूचा अतिरेकही करू नये**

कोणतीही गोष्ट प्रमाणापेक्षा जास्त झाली तर त्याचे दुष्परिणामही सहन करावे लागतात. त्यामुळे तेल असो किंवा शाम्पू दोघांचाही वापर प्रमाणात असावा. जर डोक्यावर तेलाचा जास्त मारा झाला तर डोक्यावरील भार वाढतो आणि केसदेखील तेलकट दिसून लागतात.

# फूड पॉइजनिंगपासून बचावासाठी ४ प्रभावी उपाय

**बाहेरचा आहार घेणे अनेकदा त्रासदायक ठरतं. खाद्यपदार्थ लवकर खराब होतात आणि यामुळेच फूड पॉइजनिंगचा त्रास उद्भवतो. अशाच काही टिप्स लक्षात ठेवल्या तर यापासून वाचता येऊ शकतं.**

- **लिंबाचे सेवन**

लिंबात अँटी-इंफ्लेमेटरी, अँटीबेक्टेरियल आणि अँटीव्हायरल गुण आढळतात. म्हणून लिंबू पाणी पिण्याने बॅक्टेरिया मरतात. आपण रिकाम्यापोटी लिंबू पाणी पिऊ शकता. शक्य असल्यास गरम पाण्यात लिंबू पिळून पिऊ शकतात. परंतु पाणी स्वच्छ असावे याची काळजी घेणे अती आवश्यक आहे.

- **तुळशीचे सेवन**

तुळशीत आढळणारे अँटीमिकोबियल गुणधर्म सूक्ष्मजीवांच्या सामोरे जातात. तुळस अनेक प्रकारे आहारात सामील करता येईल. दह्यात तुळशीचे पान, काळीमिरी आणि मीठ घालून सेवन करू शकता किंवा चहात तुळशीचे पान टाकून सेवन करू शकता.

- **दह्याचे सेवन**

दही एका प्रकारे अँटीबायोटिक आहे आणि यात जरा काळं मीठ घालून खाल्ल्याने आराम मिळेल.

- **लसणाचे सेवन**

लसणात अँटी फंगल गुण असल्यामुळे सकाळी रिकाम्या पोटी लसणाच्या १-२ पाकळ्या पाण्यासह घेतल्याने आराम मिळेल.



# बहुगुणकारी ताडगोळे

**ताडगोळे हे फळ वर्षामध्ये ठरावीक ऋतूमध्ये, म्हणजे उन्हाळ्यामध्ये उपलब्ध असणारे फळ आहे. याची चव काहीशी शहाळ्यातील मलई प्रमाणे लागत असून, चवीला हे फळ मधुर असते. इंग्रजी भाषेमध्ये 'आईस ॲपल' या नावाने ओळखले जाणारे हे फळ आरोग्याच्या दृष्टीने देखील अतिशय गुणकारी असल्याचे म्हटले जाते. या फळाला मुंजाल या नावानेही काही प्रांतांमध्ये ओळखले जाते. या फळाचे आरोग्यासाठी असणारे फायदे जाणून घेऊ या...**



**ज्यांना** वजन घटवायचे असेल, त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे आणि यामध्ये असलेल्या रसामुळे भूक शमण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार काही ना काही खाण्याची इच्छा होत नाही. ज्यांना लिव्हरशी निगडित काही समस्या असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उपयुक्त आहे.

या फळामध्ये पोटॅशियम मुबलक मात्रेमध्ये असून त्यामुळे लिव्हरमध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. या फळाच्या सेवनामुळे शरीराला श्रम करण्यासाठी आवश्यक ताकद आणि ऊर्जा मिळत असते. या फळाच्या सेवनामुळे शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्यामुळे दिवसभराच्या कामासाठी लागणारी ताकद या फळाच्या सेवनाने मिळत असते.

या फळाच्या सेवनाने शरीराला आवश्यक असलेले क्षार आणि इतर पोषक तत्त्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात. ज्यांना त्वचेवर उन्हाळ्यामुळे सतत पुरळ येत असेल किंवा ज्यांना या दिवसांमध्ये चेहऱ्यावर सतत मुरुमे येत असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोगप्रतिरोधी तत्त्वे असून, विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले गेले आहे. या फळामध्ये अँथोसायनिन नामक फायटोकेमिकल स्तनाच्या कर्करोगापासून बचाव करणारे आहे. आरोग्यासाठी या फळाचे फायदे पुरेपूर मिळवण्यासाठी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये या फळाचे भरपूर सेवन करावे.

# कोणतेही ॲप डाऊनलोड करताना राहा सावध!

## 'या' ४ गोष्टींकडे द्या विशेष लक्ष, नुकसान होणार नाही

**युजर्स** गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहिती आहे का? गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे कधी-कधी धोकादायक ठरू शकते. कसे ते जाणून घ्या. आजकाल प्रत्येकाकडे स्मार्टफोन असतो आणि त्यामध्ये अनेक ॲप्स असतात. या ॲप्समुळे रोजची अनेक महत्त्वाची कामे कुठल्याही अडचणींशिवाय पार पडतात. अनेक जण गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहीत आहे का की, काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. तुम्ही अँड्रॉइड युजर असाल तर ही विशेष माहिती नक्कीच तुमच्या कामी येईल. पाहा डिटेल्स.



**हे असू शकते धोकादायक**

काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. कारण, गुगल प्ले स्टोअर मालवेअर आणि हॅकर्ससाठी ॲप्स फारसे स्कॅन करत नाही. अशा परिस्थितीत गुगलच्या स्टोअरवर मालवेअर प्रभावित ॲप्स असण्याची शक्यता आहे. तुम्ही हे ॲप डाऊनलोड केल्यास ते तुमचा वैयक्तिक डेटा चोरू शकतात. हे तुमची आर्थिक ओळखपत्रे देखील चोरू शकतात.

**असे सुरक्षित रहा**

तुम्ही डाऊनलोड करत असलेले ॲप तुम्हाला कोणत्या पर्मिशन्स विचारतात याकडे नेहमी लक्ष दिले पाहिजे. उदाहरणार्थ- तुम्ही एडिटिंग ॲप डाऊनलोड केल्यास ते ॲप तुम्हाला स्टोरेज, कॅमेरा, मायक्रोफोन आणि फोटो गॅलरी यासाठी परवानगी मागते. पण त्या ॲपला कोणत्या परवानग्या हव्यात याकडे तुम्हाला लक्ष द्यावे लागेल. जेव्हाही आपण एखादे ॲप डाऊनलोड करतो तेव्हा त्याचे रिव्ह्यू नक्की वाचा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण, लोक त्यांच्या ॲपच्या अनुभवावर आधारित रिव्ह्यू देतात. तुम्हाला ॲपचे वाईट रिव्ह्यू आढळल्यास ॲप डाऊनलोड करू नका.

जेव्हा तुम्ही एखादे ॲप डाऊनलोड करता, त्याआधी ते ॲप किती वेळा डाऊनलोड केले आहे ते पहा. ही तपासणी करणेदेखील महत्त्वाची आहे. कारण, जितक्या जास्त लोकांनी ॲप डाऊनलोड केले आहे तितकाच ॲपवर अधिक विश्वास निर्माण होतो.

गुगल प्ले स्टोअरवर प्रत्येक ॲप निर्माता त्यांच्या ॲपबद्दल तपशील देतो. त्याचा स्त्रोत काय आहे हेदेखील सांगतो. जर तुम्हाला स्त्रोत योग्य वाटत असेल किंवा तपशील बरोबर असतील तरच ॲप डाऊनलोड करा.

# धकाधकीच्या जीवनात ग्रीन टीचे फायदे

**आजचे** धकाधकीचे जीवन, बदलती जीवनशैली, बदलते आहार यांमुळे अनेक आजार डोकं वर काढत आहेत. एवढंच नाही तर वाढत्या कामाच्या तणावामुळे गेल्या काही वर्षांपासून ग्रीन टी नियमित पिणाऱ्यांच्या संख्येतसुद्धा वाढ होताना दिसत आहे. योग्य आणि नियमित प्रमाणात ग्रीन टीचे सेवन शरीरास हितकारक ठरू शकते.



परंतु ग्रीन टीचे प्रमाणाबाहेर सेवन केल्यास ते आरोग्यास घातकदेखील ठरू शकते. ग्रीन टीमध्ये थेनाईन तत्त्व जास्त प्रमाणात असतात, त्यामुळे अमिनो ॲसिड बनते. अमिनो ॲसिड शरीरात ताजेपणा कायम ठेवण्यास मदत करते. तसेच तुम्हाला थकवा जाणवत नाही. सध्या तरुणांमध्ये आणि वृद्धांमध्ये कॅव्हिटीच्या समस्या वेगाने वाढत आहेत. ग्रीन टीमध्ये कॅफीन असते जे दातांवरील किटाणू मारण्यास सक्षम असते. बॅक्टेरिया कमी झाल्याने अधिक काळापर्यंत तुमचे दात चांगले राहतात. सतत वाढत्या कामामुळे, दररोजच्या व्यस्त वेळापत्रकामुळे रक्तदाबाच्या समस्यांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. रक्तदाबाचा त्रास असल्यास त्यावर ग्रीन टी फायदेशीर आहे. त्याचप्रमाणे हृदयरोग असणाऱ्यांसाठी ग्रीन टीचे सेवन फायदेशीर ठरते. वजन कमी करण्यासाठी ग्रीन टी उपयोगी ठरते. ग्रीन टी प्यायल्याने शरीरातील मेटाबॉलिज्म रेट वाढतो ज्यामुळे पाचनक्रिया सुरळीत होते.



# पिअर्सिंग करताना द्या 'या' गोष्टींकडे लक्ष

बाजारामध्ये सध्या नवनवीन फॅशनचा ट्रेण्ड येत आहे. प्रत्येक ऋतूप्रमाणे हा ट्रेण्ड बदलत जातो. विशेष म्हणजे आजची तरुणाईदेखील हा फॅशन ट्रेण्ड उत्तमरित्या कॅरी करताना दिसत आहे. त्यातच मग पाहायला गेलं तर आज प्रत्येक तरुणाईच्या अंगावर टॅटू किंवा पिअर्सिंग दिसून येतात. अनेक जण आवड म्हणून तर काही जण केवळ फॅशन म्हणून या गोष्टी करतात. सध्या तरुणाईमध्ये पिअर्सिंगची मोठ्या प्रमाणावर क्रेझ दिसून येत आहे. मात्र, पिअर्सिंग करताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली पाहिजे. पिअर्सिंग म्हणजे शरीरावरील काही भागांवर रिंग किंवा अन्य एखादा दागिना टोचून घेणे. यामध्ये अनेक जण कान, नाक, भुवयी किंवा ओठांवर टोचून घेतात. मात्र, अनेक वेळा शरीरावर टोचून घेतल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष केल्यास अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.





- **संसर्ग होणे –**

पिअर्सिंग करताना विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यासोबतच एखाद्या एक्सपर्ट व्यक्तीकडून हे करून घ्यावं. कारण अनेक वेळा हलगर्जीपणामुळे पिअर्सिंग करताना रक्तात संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे जर संसर्ग झाल्याची शक्यता निर्माण झाल्यास त्वरित डॉक्टरांकडे जावे.

- **ॲलर्जी होणे–**

विशिष्ट धातूंचा वापर करून शरीरावर बॉडी पिअर्सिंग करण्यात येतं. काही जणांची त्वचा सेन्सेटिव्ह असते. त्यामुळे अशा व्यक्तींना या धातूपासून ॲलर्जी होण्याची शक्यता असते. त्यामुळे अनेक वेळा बॉडी पिअर्सिंग केल्यानंतर सूज येणे, रॅशेस येणे यासारख्या समस्या निर्माण होतात.

- **अतिरिक्त रक्तस्त्राव–**

बॉडी पिअर्सिंग करतान कधी कधी सुई चुकीच्या ठिकाणी टोचली जाते. परिणामी, अशा ठिकाणाहून रक्तस्त्राव होण्यास सुरुवात होते. त्यामुळे पिअर्सिंग करताना विशेष काळजी घेण्याची गरज असते.

- **तज्ज्ञ व्यक्तीकडून पिअर्सिंग करावे –**

पिअर्सिंग कधीही या क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा योग्य प्रशिक्षित व्यक्तीकडून करून घ्यावं. कमी अनुभवी व्य तकडून पिअर्सिंग करून घेतलं. तर त्याचा थेट परिणाम तुमच्या शरीरावर होऊ शकतो. चुकीच्या ठिकाणी पिअर्सिंग करून घेतल्या तर या ठिकाणचा भाग मृत होण्याची शक्यता असते.

# काळे, दाट, सुंदर केसांसाठी ऑलिव्ह ऑइलचा वापर

**जास्त उन्हात केसांच्या अनेक समस्या निर्माण होतात. शरीराची विशेष काळजी घेणं या वेळी गरजेचं असतं. गर्मीमुळे घाम, ओलसरपणामुळे केस अधिकच खराब व्हायला लागतात. त्यात बदललेल्या जीवनशैलीचा आणि खाण्या-पिण्याचा परिणाम... अशात केसांची योग्य ती काळजी घेणं गरजेचं असतं... त्यासाठी ऑलिव्ह ऑईल उपयुक्त आहे.**

- ऑलिव्ह ऑइलनं केसांची मसाज करा, हे एक उत्तम कंडिशनर आहे.
- ऑलिव्ह ऑइल एक अँटी ऑक्सिडेंटचं काम करतं. त्यामुळं डॅड्रफ आणि केस पांढरे होण्यापासून वाचतात.
- जर आपण केसांसाठी होममेड ट्रिटमेंट घेऊ इच्छिता तर ऑलिव्ह ऑइल बेस्ट आहे. ते आपले केस हेल्दी करतात.
- ऑलिव्ह ऑइलमध्ये मोनो सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड असतं. जे केसांना नैसर्गिक ओलावा देतं.
- ऑलिव्ह ऑइल त्वचेसाठीही फायद्याचे आहे. यानं मालिश केल्यास त्वचेतील ओलावा टिकून राहतो.



# डायबेटिसपासून स्वताचे रक्षण करण्यासाठी हे टाळा

**सध्या जगातील सर्वात जास्त भेडसावणारी समस्या म्हणजे डायबेटिस... जगात भारत हा डायबेटिसचा मोठा बळी आहे. भारतात डायबेटिसग्रस्त लोकांची संख्या नवनवे आकडे पार करतेय. डायबेटिस पूर्णपणे बरा करता येत नसला तरी काही प्रमाणात रोखला जाऊ शकतो. त्यापासून स्वत:चे रक्षण करता येते. त्यामुळे तुम्ही या विकाराचे बळी होऊ नये म्हणून काही काळजी घेणे आवश्यक आहे.**



- **वजन घटवा**

तुम्ही जर स्थूल असाल तर तुमचे वजन कमी करण्याचा प्रयत्न करा. जास्त वजन हे डायबेटिस होण्यासाठी पूरक असते. वजन घटवल्याने शरीरात तयार होणाऱ्या इन्शुलिनमध्ये वाढ होते आणि त्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होण्यास मदत होते.

- **नाश्ता करा**

सकाळी उठल्यानंतर दोन ते तीन तासांत नाश्ता करण्याची सवय स्वतःला लावून घ्या. यामुळे डायबेटिसचा धोका कमी होण्यास मदत होते. नाश्ता करणे अजिबात टाळू नका.

- **तंतूमय (फायबर) पदार्थांचे सेवन करा**

आहारात फळे, भाज्या, डाळी आणि टणक कवचाच्या फळांचा समावेश करा. तंतूमय पदार्थांचा आहारात समावेश असणे फार गरजेचे आहे. आहारातून शरीरात येणाऱ्या शर्करेचे प्रमाण कमी करण्यास हे पदार्थ मदत करतात.

- **शारीरिक व्यायाम**

नियमित व्यायाम करणे तुमच्या आरोग्यासाठी गरजेचे आहे. व्यायामामुळे केवळ वजन कमी होते असे नाही, तर शरीरात उत्पन्न होणारे इन्शुलिन योग्य पद्धतीने वापरले जाते. त्यामुळे डायबेटिसचा धोका कमी होतो.

- **धूम्रपान टाळा**

तुम्ही जर धूम्रपान करत असाल तर ते आताच बंद करा. टाईप २ चा डायबेटिस धूम्रपानामुळे होण्याची मोठ्या प्रमाणात शक्यता असते. त्यामुळे या कारणाला बगल देणे गरजेचे आहे.



# हँड ड्रायरखाली हात सुकवणं धोकादायक, जाणून घ्या याचे कारण




**हॉटेल, थिएटरमध्ये, 'हँड ड्रायर'खाली हात सुकवणं सर्वाधिक धोकादायक असल्याचं एका संशोधनातून समोर आलंय. टॉयलेटमध्ये हँड ड्रायरमुळे हात आणि शरीरावर बॅक्टेरिया चिकटण्याची शक्यता जास्त असून तज्ज्ञ डॉक्टरांनी याला दुजोरा दिला आहे.**

**विमानतळ,** रेस्टॉरंट, कॉर्पोरेट ऑफिस किंवा शहरातील काही टॉयलेटमध्ये हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरचा वापर केला जातो. ओले हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरखाली काही सेकंद हात धरले जातात. त्यामुळे हात कोरडे होतात. पण अशा पद्धतीने हात सुकवणं आरोग्यासाठी घातक आहे. ॲप्लाईड आणि इन्वॉयर्नमेंटल मायक्रोबायोलॉगी जर्नलमध्ये छापण्यात आलेल्या एका संशोधनानुसार, हँड ड्रायरखाली हात सुकवल्याने आपल्या स्वच्छ हातावर पुन्हा जंतू किंवा बॅक्टेरिया बसण्याची शक्यता असते. ड्रायरच्या वापरामुळे हवेतील 'बॅक्टेरियल पॉथजीन्स स्पोअर्स' धारांमध्ये शिरू शकतात. ज्यामुळे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. हँड ड्रायरच्या वापराने हातावर अधिक बॅक्टेरिया येण्याची शक्यता असते.

टॉयलेटमध्ये असणाऱ्या हवेत फ्लोटिंग बॅक्टेरिया असतात. त्यापैकी आपण हँड ड्रायरचा वापर करतो, त्या वेळी ते बॅक्टेरिया हातावर चिकटण्याची शक्यता असते. या बॅक्टेरियामुळे अनेक आजारही होऊ शकतात, असं सेंट जॉर्ज रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मधुकर गायकवाड यांनी सांगितलं.

सशोधकांनी एक प्लेट ३० सेकंद हँड ड्रायरखाली धरली. या प्लेटवर १८ ते ६० विविध बॅक्टेरिया जमा झालेले दिसले. पण हँड ड्रायरच्या आतील बाजूस मात्र कमी प्रमाणात बॅक्टेरिया होते. हँड ड्रायर बंद करूनही प्लेट दोन मिनिटे धरली. त्या प्लेटवर कमी प्रमाणात बॅक्टेरिया आढळून आले. ही प्लेट पुन्हा टॉयलेटमध्ये फॅन सुरू ठेवून २० मिनिटे धरण्यात आली. या प्लेटवर १५ बॅक्टेरिया सापडले. मात्र, या मशीनशिवाय आपण टॉवेल किंवा टिशू वापरु शकतो आणि या मशीनचा वापर टाळू शकतो, असा सल्ला तज्ज्ञांनी दिलाय.

## महानगरपालिका क्षेत्रात निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदानाची सुविधा
# नवी मुंबई महापालिकेकडून विशेष सहाय्यता कक्ष स्थापन




"महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी रायगड जिल्ह्यातील कर्मचारी, तसेच नवी मुंबईतील सिडको, इतर शासकीय-निमशासकीय कार्यालये व खासगी शाळांमधील कर्मचारी निवडणूक कर्तव्याकरिता नियुक्त करण्यात आले आहेत. नवी मुंबईचे मतदार आहेत, मात्र त्यांची नियुक्ती निवडणूक कर्तव्यावर झाली आहे, अशा कर्मचाऱ्यांना मतदान करता यावे, पालिकेच्या आठही निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात टपाली मतदान सहाय्यता कक्ष स्थापन करण्यात आले आहेत."

**स्मिता काळे, नोडल अधिकारी तथा उपायुक्त**

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी मोठ्या संख्येने शासकीय व निमशासकीय कर्मचारी कार्यरत असतात. निवडणूक कर्तव्यावर असताना कर्मचाऱ्यांचा मतदार म्हणून मतदानाचा हक्क डावलला जाऊ नये, यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार टपाली मतदान सुविधा नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ही व्यवस्था महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मतदार म्हणून नोंदणी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अंतिम मतदार यादीत आपले नाव व क्रमांक तपासून, आपण ज्या प्रभागाचे मतदार आहोत त्या प्रभागाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दि. ८ जानेवारी २०२६ रोजी प्रपत्र पीबी-१ नमुन्यात अर्ज सादर करून टपाली मतपत्रिकेची मागणी करणे आवश्यक आहे. या अजासीबत निवडणूक कर्तव्यावर नियुक्तीचा आदेश जोडणे बंधनकारक आहे.

त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून संबंधित कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिका प्रदान करण्यात येईल. अर्जदाराने प्रपत्र पीबी-७ मधील सूचनांचे पालन करून टपाली मतपत्रिकेवर मतदान नोंदवायचे असून, नियमांनुसार बंद लिफाफ्यात ही मतपत्रिका व आवश्यक कागदपत्रे संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात परत जमा करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेत सर्व महानगरपालिकांमध्ये सुसूत्रता व समन्वय राहावा, यासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्व महानगरपालिकांच्या आयुक्तांना पत्राद्वारे सूचना दिल्या असून, नवी मुंबई महापालिका क्षेत्रात मतदार असलेल्या व त्यांच्या महानगरपालिका क्षेत्रात निवडणूक कर्तव्यावर कार्यरत असलेल्या अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास ही बाब आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच अशाच प्रकारचे पत्र नवी मुंबई पोलीस आयुक्त यांनाही देण्यात आले आहे.

**हेल्पलाइन क्रमांक**

टपाली मतदान प्रक्रियेसाठी मदत व मार्गदर्शन मिळावे, यासाठी दि. ८, ९, १०, ११ व १२ जानेवारी या पाच दिवसांत कार्यालयीन वेळेत, आठही निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या विशेष सहाय्यता कक्षात प्रत्यक्ष उपस्थित राहता येणार आहे. तसेच माहिती व अडचणींसाठी ९८१९४५२४८७ हा हेल्पलाइन क्रमांक कार्यालयीन वेळेत कार्यरत ठेवण्यात आला आहे. याशिवाय nmmcpostalballot@gmail.com हा ई-मेल आयडी संपर्कासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**पालिकेचे आवाहन**

निवडणूक प्रक्रियेत कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निदेर्शानुसार व नियमानुसार टपाली मतदानाची संपूर्ण व्यवस्था करण्यात आली असून, निवडणूक कर्तव्यावर कार्यरत कर्मचाऱ्यांनी या सुविधेचा लाभ घेऊन लोकशाहीने दिलेला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## अकरावी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना करणार संपर्क
# शिक्षण उपसंचालक कार्यालयाचा उपक्रम

**■मुंबई। प्रतिनिधी,**

अकरावी प्रवेशापासून एकही विद्यार्थी वंचित राहू नये, यासाठी शिक्षण संचालनालयाने अंतिम विशेष फेरी राबवली. या फेरीत राज्यभरातील ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी अर्ज केले. यापैकी सुमारे १०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले नसल्याने या विद्यार्थ्यांना दूरध्वनी करून प्रवेशाबाबत विचारणा करण्याचा निर्णय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने घेतला आहे.

यंदा संपूर्ण राज्यात अकरावीचे प्रवेश ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. प्रवेशाच्या विविध फेऱ्या राबवण्यात आल्या. यानंतरही प्रवेश न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी आणखी एक फेरी राबवण्याची मागणी राज्यभरातील पालकांनी केली होती. त्यानुसार शिक्षण संचालनालयाने १३ ते १७ डिसेंबर या कालावधीमध्ये विशेष फेरी राबवली. या फेरीत राज्यभरातून ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी अर्ज केले. या फेरीला नवीन अर्ज करणे व भाग दोन भरण्यासाठी पहिल्या दिवशी फारच कमी प्रतिसाद मिळाल्याने अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर या अंतिम विशेष फेरीसाठी निवड यादी जाहीर करण्यात आली. या यादीमध्ये ज्या विद्यार्थ्यांना कनिष्ट महाविद्यायलामध्ये प्रवेशाची संधी मिळाली त्यांनी प्रवेश निश्चित केले.



या फेरीत प्रवेश मिळाल्यानंतरही काही विद्यार्थांनी महाविद्यालयात प्रवेश घेतले नाहीत. तर काही विद्यार्थांना महाविद्यालय मिळाले नाही.

**विद्यार्थ्यांची यादी उपलब्ध करून देणार**

अशा सुमारे १०० विद्यार्थ्यांना ८ ते १० जानेवारी या कालावधीत शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून संपर्क साधण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची विनंती करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांची यादी शिक्षण संचालनालयाकडून संबधित शिक्षण उपसंचालक कार्यालयाला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या यादीनुसार संबंधित कार्यालयांना विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. विद्यार्थ्यांच्या प्रतिसाद पाहून अकरावी प्रवेश प्रक्रिया बंद करण्यात येणार असल्याचे शिक्षण संचालनालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## डोंबिवलीतील बंद घरात मानव सदृश्य कवटी व सांगाडा सापडल्याने खळबळ



**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली येथे एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शहरातील एका बंद घरात मानवी कवटीसह सांगाडा आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरू केला असून हा मृत्यू गुन्हेगारी स्वरूपाचा आहे की अपघाती, याचा शोध घेतला जात आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवलीतील सोनारपाडा परिसरातील म्हात्रे नगर येथील एका चाळीत असलेल्या बंद घरात शनिवारी (दि.३) एका व्यक्तीला मानवी सदृश्य अवशेष आढळले. त्यानंतर त्या घटनेची माहिती तातडीने मानपाडा पोलीस ठाण्याला देण्यात आली, असे एका पोलीस अधिकाऱ्याने मंगळवारी (दि.६) सांगितले. पीटीआयच्या वृत्तानुसार, पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन मानवी कवटीसारखी दिसणारी कवटी, हाडे, कपडे, चप्पल, बांगड्या, केसांचे नमुने तसेच रक्ताने माखलेली माती जप्त केली आहे. प्राथमिक तपासानंतर, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार हे अवशेष मुंबईतील जे. जे. रुग्णालयात शवविच्छेदन व सखोल फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. या प्रकरणी मानपाडा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, मृत व्यक्तीची ओळख पटवणे आणि मृत्यूचे कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

## ठाण्यातील वागळेनंतर येऊरमध्येही बिबट्या

**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाण्यातील वागळे इस्टेट या परिसरातील वारलीपाडा भागात रात्री एका भटक्या श्वानावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना अलीकडेच समोर आली होती. मात्र आता या संदर्भात अजून एक नवीन चिंताजनक बाब समोर येत आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील येऊर प्रवेशद्वाराजवळील परिसरात एका भटक्या श्वानावर बिबट्याने हल्ला करत त्याला आजूबाजूच्या झाडाझुडपात ओढत नेले.

हा विडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित होत आहे. यामुळे येऊर, आनंद नगर आणि उपवन परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण आहे. या अगोदर गेल्या काही दिवसांपासून पोखरण रोड आणि वागळे इस्टेट येथील वारलीपाडा परिसरामध्ये एका बिबट्याचा वावर असल्याचे आढळल्याने नागरिकांद्वारे प्रशासनाला या संदर्भात माहिती देण्यात आली होती. मात्र शनिवार, रोजी येऊर प्रवेशद्वार येथील एका भटक्या श्वानावर बिबट्याने हल्ला केल्याचे सीसीटीव्ही कॅमेरात स्पष्ट झाले आहे.

या घटनेची माहिती ठाणे वन विभागाला कळताच ठाणे वन विभागाने दखल घेत तत्काळ घटनास्थळी धाव घेत बिबट्यासाठी शोध मोहीम



सुरु केली आहे.

वन विभाग पथकाने येऊर, उपवन आणि वाघबीळ या परिसरात शोध मोहीम राबवली जात आहे. मात्र, वन विभागाला अद्याप बिबट्या आढळून आला नाही. या घटनेनंतर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या येऊर प्रवेशद्वाराजवळ आणि इतर परिसरात देखील शोध मोहीम सुरूच आहे. मिळालेल्या माहितीनुसार भटका श्वान येऊर प्रवेशद्वारा जवळून जात असताना अचानक बिबट्याने झुडपांमधून बाहेर येत श्वानाला ओढत झुडपांमध्ये नेले. याजवळच येऊर प्रवेशद्वाराजवळ वन विभागाचे कार्यालय आहे.

सद्यस्थिती पाहता वन विभागाने नागरिकांना संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात प्रवेशास मज्जाव केला आहे. तसेच या परिसरात सकाळी फेरफटका मारण्यासाठी येर्णाया नागरिकांची संख्याही कमालीची रोडावली आहे.

## चेंदणी कोळीवाड्यावर राजकीय घाला! मतांसाठी गावठाण विकण्याचा डाव




**हा लढा घरांचा नाही, अस्तित्वाचा**

चेंदणी कोळीवाड्यातील मागण्या राजकीय नसून त्या मूलभूत, कायदेशीर आणि अस्तित्वाशी संबंधित आहेत. ठाणे महानगरपालिका प्रशासनाने या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास कोळी समाज रस्त्यावर उतरून तीव्र संघर्ष करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. चेंदणी कोळीवाडा विकायला नाही, तो वाचवण्यासाठी कोळी समाज एकवटला आहे,ह्व असा ठाम निर्धार कोळी बांधवांनी व्यक्त केला आहे.

**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे पूर्वेतील चेंदणी कोळीवाडा जिथे पिढ्यानपिढ्या समुद्राशी नाते जपणारा कोळी समाज वास्तव्यास आहे, जिथे घाम, श्रम आणि श्रद्धेवर उभा राहिलेला इतिहास आहे, त्या गावठाणावर आज थेट राजकीय डोळा पडल्याचा गंभीर आरोप स्थानिक कोळी समाजाकडून करण्यात येत आहे.

गावठाण विस्तारित जमिनीवर उभ्या असलेल्या अनधिकृत घरांच्या जागेवर येणाऱ्या निवडणुकांचे गणित साधण्यासाठी काही राजकीय नेत्यांनी येथे झोपडपट्टी पुनर्विकासाचा घाट घातल्याचा आरोप होत आहे. सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही या जागेवर पुनर्विकास होऊ शकत नाही, हे माहीत असतानाही मतांच्या लालसेपोटी नागरिकांची दिशाभूल केली जात असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.

चेंदणी कोळीवाडा हा ठाणे शहरातील मूळ भूमिपुत्र असलेल्या कोळी समाजाचे गावठाण आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ नुसार या गावठाणाचे विस्तारित सीमांकन होणे हा कायदेशीर हक्क आहे. मात्र वर्षानुवर्षे हा हक्क डावलला जात असून, कोळी समाजाला जाणूनबुजून अतिक्रमणधारक ठरवले जात आहे.

सध्याच्या विकास आराखड्यानुसार कोळीवाड्यांवर शहरातील विकसित भागांप्रमाणेच नियम लादले जात आहेत. परिणामी कोळीवाड्यातील घरांची दुरुस्ती, पुनर्बांधणी किंवा विकास करणे जवळपास अशक्य झाले आहे. त्यामुळे कोळीवाड्यांसाठी स्वतंत्र विकास नियमावली लागू करण्याची मागणी पुन्हा ऐरणीवर आली आहे.चेंदणी कोळीवाड्याच्या पूर्व व पश्चिम भागातील काही क्षेत्र क्लस्टर अंतर्गत दाखवण्यात आले असून, यामध्ये ऐतिहासिक श्री विठ्ठल रुखुमाई मंदिराचाही समावेश आहे. धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा असलेला हा भाग क्लस्टरमधून तात्काळ वगळण्यात यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

रेल्वे लाइनलगत १२ मीटर रुंद रस्ते प्रस्तावित करून कोळी समाजाची वंशपरंपरागत घरे बाधित केली जाणार आहेत. विकासाच्या नावाखाली मुळावर उठलेला हा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी कोळी बांधवांनी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विस्तारित गावठाणाच्या १५० मीटर परिसरातील गायरान जमीन ही गावकऱ्यांच्या सार्वजनिक वहिवाटीसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. मात्र चेंदणी कोळीवाड्याच्या पश्चिम भागातील सिडको मैदान आणि पूर्व भागातील चेंदणी बंदराचा परिसरही आज धोक्यात आला आहे. हा संपूर्ण भाग कोळी समाजाच्या सार्वजनिक वापरासाठी राखीव ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## इंस्टाग्रामवर १७ वर्षीय मुलीशी मैत्री आणि लैंगिक अत्याचार
### पालघरमध्ये नराधमाकडून सोशल मीडियावर 'तसले' फोटो शेअर

**नेमकं काय घडलं?**

पालघरमधील वालीव येथील रहिवासी असलेल्या पीडितेची सोशल मिडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामद्वारे आरोपीशी मैत्री झाली होती. त्यांच्या मैत्रीचे रुपांतर हे नात्यात झाले. याच प्रकरणा दरम्यान पीडिता ही आरोपीसोबत मध्य प्रदेशात निघून गेली होती. पीडित मुलगी ही फेब्रुवारी ते सप्टेंबर २०२५ रोजी आरोपीसोबत राहिली होती, त्याच काळात तिचा छळ आणि लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे, असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं आहे. पीडितेच्या बहिणीने केलेल्या काही तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी २८ डिसेंबर रोजी आरोपीविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम ६४ आणि पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्याने दिली.

**■अमरावती।प्रतिनिधी,**

पालघर जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका अल्पवयीन मुलीची इंस्टाग्रामवर एका अज्ञात मुलीशी ओळख झाली. नंतर त्या दोघांमध्ये मैत्री झाली आणि नंतर त्यांचे मैत्रीचे रुपांतर हे नात्यात झालं. हे प्रकरण इथवर न थांबता पुढे वाढले, त्यानंतर हे प्रकरण ब्लॅकमेलपर्यंत पोहोचल्याचं सांगण्यात येत आहे. अशातच मुलींचे अश्लील फोटो हे सोशल



मीडियावर व्हायरल करण्यात आले. या प्रकरणात पोलीस शोध घेत असल्याचं सांगण्यात येत आहे.

**आरोपीकडून अल्पवयीन मुलीवर छळ करत 'तसले' फोटो सोशल मीडियावर केले शेअर**

पीडित मुलगी ही आरोपीच्या घरातून पळून जाण्यात यशस्वी ठरली आणि सप्टेंबर महिन्यात तिच्या पालकांच्या घरी परतली. आरोपीने पीडितेला बदनाम करण्यासाठी आणि तिला परत आपल्याकडे येण्यास भाग पाडण्यासाठी सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर आक्षेपार्ह फोटो पोस्ट करण्यास सुरुवात केली, ज्यात तिच्या अश्लील फोटोंचा समावेश होतो, असे पीडितेनं सांगितलं. या प्रकरणी आरोपीवर गेल्या वर्षी फेब्रुवारीत अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचं वृत्त होतं.



## पप्पा, मला त्रास होतोय, पिरियड्स चालू आहेत
### म्हणत लेक गयावया करत होती, पण नराधम बापाला दिसले फक्त ५००० रुपये!

**■मुंबई। प्रतिनिधी,**

समाजात वडिलांना मुलीचे संरक्षक मानले जाते, मात्र कर्नाटकातील चिक्कमगलुरु जिल्ह्यातून पितृत्वाला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका नराधम पित्याने पैशांच्या हव्यासापोटी आपल्या अल्पवयीन मुलीचा सौदा करून तिला वेश्यावृत्तीच्या विळख्यात ढकलले.

विशेष म्हणजे, या घृणास्पद गुन्ह्यात मुलीच्या सख्ख्या आजीनेही सैतानाला साथ दिल्याचे उघड झाले असून, पोलिसांनी या प्रकरणी वडील आणि आजीसह एकूण १२ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

**फक्त ५ हजारांसाठी पित्याने मुलीला विकलं**

डिसेंबर महिन्याचा तो काळ पीडित मुलीसाठी काळरात्र ठरला. तिचे वडील तिला घेऊन आजीकडे गेले होते. दोन दिवस तिथे राहून पुन्हा घरी परतायचं असं मुलीला वाटलं होतं. पण त्या दोन दिवसांच्या मुक्कामात आजी आणि वडिलांनी मिळून तिच्या आयुष्याचा सौदा आधीच पक्का केला होता. तिथेच त्यांची भेट भरत शेट्टी नावाच्या एका दलालाशी झाली. त्याने बापाला पैशांचं अमिष दाखवलं आणि तिथूनच या मुलीच्या छळाला सुरुवात झाली. भरत शेट्टीने वडिलांना असं पटवून दिलं की, "जर तुझी मुलगी या धंद्यात आली, तर ती दररोज ५ हजार रुपये सहज कमवेल." पैशांच्या आकड्यांनी या बापाचे डोळे इतके दिपले की, त्याला आपल्या लेकीचा चेहराही दिसला नाही. पोटच्या पोरीच्या सन्मानापेक्षा त्याला तो '५ हजार रुपयांचा रोज' मोठा वाटला.

**मंगळुरु नेले आणि दोन दिवस नको ते घडलं**

आरोपी वडील आपल्या मुलीसह भरत शेट्टीसोबत मंगळुरुला गेले. रस्त्यात मुलीने वडिलांना सांगितले की ती मासिक पाळीमध्ये आहे आणि आजारी आहे. पण लालची वडिलांचे हृदय पाझरले नाही. दुसऱ्या दिवशी भरत शेट्टीने मुलीला धमकावले की काही लोक येतील आणि तिला त्यांच्यासोबत संबंध ठेवावे लागतील.

**पीडितेने पोलिसांना काय-काय सांगितले?**

- २० ते ४५ वर्षे वयाच्या चार पुरुषांनी तिच्यासोबत वारंवार बलात्कार केला.
- जेव्हा मुलीने विरोध केला आणि आपले वय सांगून सोडण्याची भीक मागितली, तेव्हा आरोपींनी तिचे एकही ऐकले नाही.
- आरोपी भरत शेट्टीला पैसे देऊन ते सतत दोन दिवस पीडितेचा लैंगिक शोषण करत राहिले.

हिम्मत गोळा करून अल्पवयीनने पोलिसांत तक्रार दाखल केली, ज्यानंतर पोलिसात खळबळ उडाली. पोलिसांनी जलद कारवाई करत पीडितेचे वडील, आजी आणि मुख्य आरोपी भरत शेट्टीसह एकूण १२ लोकांना अटक केली आहे. तपासात समोर आले आहे की भरत शेट्टी दक्षिण कन्नड जिल्ह्यात देह व्यापाराचे मोठे नेटवर्क चालवतो. भारत शेट्टीवर मंगळुरु आणि उडुपीमध्ये यापूर्वीच वेश्यावृत्तीचे ८ पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत. पोलिस आता या टोळीशी संबंधित इतर लोकांच्या शोधात छापेमारी करत आहेत.

**शिक्षणाची ओढ, पण नियतीचा क्रूर खेळ**

पीडित मुलगी बिरूर येथील रहिवासी असून, काही दिवसांपूर्वीच तिच्या आईचे निधन झाले होते. आईच्या पश्चात ती आपल्या नातेवाईकांकडे राहून जिद्दीने शिक्षण घेत होती. पीयूसी (१२ वी) पूर्ण केल्यानंतर, वडिलांचा आधार मिळेल या आशेने ती आपल्या घरी परतली. मात्र, ज्या घराकडून तिला संरक्षणाची अपेक्षा होती, तिथेच तिच्या शोषणाचा कट रचला जात होता. तिच्या स्वतःच्या वडिलांनी आणि जवळच्या नातेवाईकांनी मिळून तिला वेश्यावृत्तीच्या व्यवसायात ढकलले. या नराधम पित्याने मुलीला अमानवीय कृत्ये करण्यास भाग पाडले. मुलीने वारंवार नकार दिला, रडून विनवणी केली, मात्र पैशांच्या मोहात आंधळ्या झालेल्या पित्याने पोटच्या मुलीचा टाहो ऐकला नाही. अखेर या अत्याचाराची माहिती समोर येताच पोलिसांनी तपास चक्रे फिरवून या 'सॅक्स रॅकेट'चा पदार्फाश केला. पोलिसांनी आतापर्यंत १२ जणांना अटक केली असून, या घटनेमुळे संपूर्ण कर्नाटक राज्यात संतापाची लाट उसळली आहे.

## वर्दी घालून आला आणि रात्री घराबाहेर पडलेल्या तरुणीला उचललं...
# स्कोर्पिओत बसवून सामूहिक बलात्कार!

**■मुंबई। प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील कानपूरमधून सामूहिक बलात्काराचं भयानक प्रकरण उघडकीस आलं आहे. येथील सचेंडी परिसरात एका अल्पवयीन मुलीला बळजबरीने कारमध्ये बसवून तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याचं समोर आलं आहे. पीडिता रात्री शौचासाठी घराबाहेर पडली असता जवळच उभ्या असलेल्या कारमधील तरुणांनी तिला बळजबरीने गाडीत बसवलं आणि त्यानंतर, तिच्यासोबत घृणास्पद कृत्य केलं. घटनेनंतर, आरोपीने रात्री पीडितेला घराजवळ सोडून नंतर फरार झाले. तरुणीच्या कुटुंबियांनी सचेंडी पोलीस स्टेशनमध्ये यासंबंधी गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे. तसेच, पीडितेवर बलात्कार करणाऱ्या आरोपींपैकी एक तरुण पोलिसांच्या वर्दीत असल्याचा आरोप आहे.

पोलिसांनी या घटनेची माहिती देताना सांगितलं की, पीडितेच्या तक्रारीवरून दोन अज्ञात आरोपींविरुद्ध सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी स्पष्ट केलं की, तपासादरम्यान आरोपींची ओळख पटवून त्यांना लवकरच अटक केली जाईल आणि त्यांची नावे एफआयआरमध्ये जोडली जातील. या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास केला जात असल्याची पोलीस अधिकाऱ्यांनी माहिती दिली.

पीडितेच्या भावाने तक्रारीत म्हटलं की, त्याची बहीण रविवारी रात्री उशिरापर्यंत घरी परतली नाही. कुटुंबातील सदस्यांनी शोध घेतल्यानंतर ती मध्यरात्री १२:०० च्या सुमारास रडत-रडत घरी परतली. तिची विचारपूस केल्यानंतर तिने सांगितलं की, दोन तरुणांनी तिला बळजबरीने काळ्या रंगाच्या कारमध्ये बसवलं आणि रेल्वे ट्रॅकजवळ नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. पीडितेच्या भावाने आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली असून त्यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची विनंती केली.



**बळजबरीने गाडीत बसवलं अन् बलात्कार**

आरोपानुसार, तरुणांनी पीडितेला बळजबरीने गाडीत बसवलं आणि नंतर तिला रेल्वे ट्रॅकजवळील एका निर्जन ठिकाणी नेण्यात आलं. तिथे, सुमारे 2 तास तरुणीवर आरोपींनी बलात्कार केला. घटनेनंतर, पीडितेची प्रकृती अतिशय खालावली आणि आरोपी तरुणांनी तिला घराजवळ सोडून फरार झाले. घटनेनंतर, पीडितेने कसंबसं स्वतःला सावरलं आणि कुटुंबियांना तिच्यासोबत घडलेल्या धक्कादायक घटनेबाबत सांगितलं. संबंधित घटनेची माहिती मिळताच, तरुणीच्या भावाने त्वरीत पोलिसांना याची माहिती दिली. सोमवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत हे प्रकरण पोहोचताच आरोपींविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com